


दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २०५ । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) रविवार २३/०८/२०२६ । पाने - ६




# एका लेकीने आईला वाचवलं... एका लेकाने कुटुंब उद्ध्वस्त केलं !

युवावार्ता (विशेष)

संगमनेर - काही बातम्या वाचून आपण वर्तमानपत्राची पाने पुढे उलटतो; पण काही बातम्या मनात खोलवर रुतून बसतात. त्या केवळ घटना राहत नाहीत, तर आपल्याला आपल्या घराकडे, आपल्या मुलांकडे आणि आपल्या पालकत्वाकडे नव्याने पाहायला भाग पाडतात. अलीकडे समोर आलेल्या दोन घटना अशाच आहेत. एका घटनेत मगरीच्या तावडीत सापडलेल्या आईला वाचवण्यासाठी एका चिमुकल्या मुलीने क्षणाचाही विचार न करता धाव घेतली आणि आईची सुटका केली. दुसऱ्या घटनेत महागड्या आयफोनच्या मागणीवरून निर्माण झालेल्या वादाने इतके टोक गाठले की मुलाला वाचवण्याच्या प्रयत्नात आई-वडिलांसह तीन जीव गमावले गेले. या दोन घटना एकमेकींपेक्षा पूर्णपणे वेगळ्या असल्या, तरी त्यांच्या केंद्रस्थानी आहे तेच नातं-पालक आणि मुलांचं.

चिपळूण तालुक्यातील वाशिष्ठी नदीकाठी नंदिनी पवार यांच्यावर मगरीने हल्ला केला. मगरीने त्यांचा पाय जबड्यात पकडून पाण्यात ओढण्याचा प्रयत्न केला. समोर आईचा जीव धोक्यात असल्याचे दिसताच त्यांच्या दहा वर्षांच्या मुलीने क्षणाचाही विलंब न करता आईचा हात पकडला आणि तिला वाचवण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्या क्षणी तिच्यासमोर मगर होती, पाण्याचा धोका होता आणि स्वतःच्या जीवाची भीतीही नक्कीच होती; पण त्या सगळ्यांपेक्षा मोठी ठरली ती आई. विचार करण्यासाठी वेळ नव्हता, कोणाचा सल्ला घेण्यासाठी वेळ नव्हता, मदत येण्याची वाट पाहण्याइतका अवकाशही नव्हता. त्या क्षणी मनाने निर्णय घेतला आणि मुलगी आईच्या मदतीला धावली. तिच्या या धाडसामुळे आईचा जीव वाचला.



ही घटना वाचताना डोळ्यांसमोर आई-मुलीच्या नात्याचं एक अत्यंत हृदयस्पर्शी चित्र उभं राहतं. ज्या आईने आयुष्यभर मुलीचा हात धरून तिला चालायला शिकवलं, त्याच आईचा हात एका क्षणी मुलीने धरला आणि तिला मृत्यूच्या तावडीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. आयुष्याची हीच तर विलक्षण उलटफेर आहे. पालक मुलांना वाढवतात, संकटांपासून जपतात; पण कधीतरी अशी वेळ येते की मुलंच पालकांची ताकद बनतात. त्या क्षणी मुलाकडे किती पैसा आहे, किती शिक्षण आहे किंवा त्याने किती मोठं यश मिळवलं आहे, याला काहीच अर्थ उरत नाही. महत्त्वाचं ठरतं ते मनात असलेलं नातं आणि संकटाच्या क्षणी कृती करण्याचं धैर्य.

पण याच वेळी दुसरी घटना मनाला अक्षरशः हादरवून टाकते. छत्रपती संभाजीनगरजवळील तीसगाव शिवारातील खवड्या डोंगराच्या अगदी कठड्यावर महागडा आयफोन घेण्याच्या मागणीवरून एका तरुणाचा आपल्या कुटुंबाकडे हट्ट सुरू झाला. त्यानंतर त्याने टोकाचं पाऊल उचलण्याची भूमिका घेतली. कुटुंबीय, नातेवाईक आणि इतरांनी त्याला समजावण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्याला परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू होते. मुलाला वाचवण्यासाठी पुढे धाव घेतलेल्या वडिलांना घेऊन तो तरुण थेट दरीत कोसळा. आई समोरच ही दुर्दैवी घटना घडल्याने आईनेही थेट डोंगरावरुन उडी मारली. या घटनेत तीघांचाही दुर्देवी अंत झाला. एका कुटुंबातील तीन जीव एका शोकांतिकेत संपले.

ही घटना केवळ 'आयफोनसाठी झालेला वाद' म्हणून पाहणे कदाचित खूप सोपे ठरेल. एका घटनेमागे अनेक भावनिक, कौटुंबिक आणि मानसिक स्तर असू शकतात. नेमकी कारणे आणि परिस्थिती तपास यंत्रणा ठरवेल. मात्र या घटनेने एक प्रश्न नक्कीच आपल्या समोर आणला आहे. आपल्या मुलांच्या इच्छा आणि गरजा यातील फरक आपण त्यांना समजावून सांगत आहोत का?

आजच्या काळात मुलांच्या हातात अत्याधुनिक मोबाईल असणे ही नवीन गोष्ट राहिलेली नाही. बाजारात रोज नवनवीन मॉडेल्स येतात. जाहिराती, सोशल मीडिया, मित्रांचे वर्तुळ आणि आसपासची जीवनशैली यामुळे मुलांच्या अपेक्षा वाढत जातात. पालकही आपल्या मुलाला इतरांपेक्षा कमी पडू नये म्हणून अनेकदा आपल्या क्षमतेपेक्षा जास्त देण्याचा प्रयत्न करतात. मुलाच्या चेहऱ्यावर आनंद पाहण्यासाठी पालक स्वतःच्या अनेक इच्छा बाजूला ठेवतात. पण प्रेम आणि प्रत्येक हट्ट पूर्ण करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत, हे कदाचित आपण विसरत चाललो आहोत.

मुलाला वस्तू देणे सोपे आहे; पण त्या वस्तूची किंमत आणि त्यापेक्षा आयुष्याची किंमत समजावून सांगणे कठीण आहे. मुलाला 'हो' म्हणणे सोपे आहे; पण योग्य वेळी 'नाही' म्हणणे आणि तो 'नाही' स्वीकारण्याची मानसिकता मुलामध्ये निर्माण करणे हे खरे पालकत्व आहे. आयुष्यात प्रत्येक इच्छा पूर्ण होत नाही, प्रत्येक गोष्ट लगेच मिळत नाही आणि प्रत्येक वेळी परिस्थिती आपल्या मनासारखी नसते. हे वास्तव मुलांना लहानपणापासून समजले तरच मोठेपणी आलेल्या नकाराला ते सामोरे जाऊ शकतात.

चिपळूणच्या घटनेतील मुलगी आणि खवड्या डोंगरावरील घटनेतील तरुण यांची तुलना करणे योग्य नाही. दोन्ही घटनांची पार्श्वभूमी वेगळी आहे, परिस्थिती वेगळी आहे आणि त्यातील व्यक्तींच्या मनातील अवस्था आपल्याला पूर्णपणे (पान २)

## राहुल गांधींच्या 'छात्रों की गूंज' कार्यक्रम उधळण्याचा प्रयत्न



युवावार्ता (प्रतिनिधी)

पुणे - देशाचे विरोधी पक्षनेते काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत छात्रों की गूंज' हा कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमाच्या आधीच पुण्यात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आणि एनएसयूआयमध्ये पुण्यातील शिवाजीनगर येथील सीईओपी तंत्रज्ञान विद्यापीठ येथे राडा झाला. यात दोन्ही गटाकडून मारहाण झाल्याचं आरोप करण्यात आला असून या प्रकरणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी प्रतिक्रिया देत सडकून टीका केली आहे. ते म्हणाले की, पुण्यामध्ये शैक्षणिक गुणवत्ता, सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या समस्यांवरून मोठा असंतोष आहे. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा भरभरून प्रतिसाद मिळत असल्याने विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. त्यामुळेच भाडोत्री गुंड पाठवून हा कार्यक्रम उधळण्याचा आणि स्टंट करण्याचा कट रचला गेला आहे, अस त्यांनी सांगितलं.पुण्यातील काँग्रेस भवन येथे काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ तसेच काँग्रेस नेते विश्वजीत कदम यांची पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्यांनी याबाबत आपलं मत व्यक्त केलंय. यावेळी हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, सीईओपी हॉस्टेलमध्ये विद्यार्थ्यांना मारहाण आणि विद्यार्थिनींना खोलीत डांबून ठेवण्याचा अभविपच्या गुंडगिरीचा प्रकार अत्यंत गंभीर आणि संतापजनक आहे. फक्त राहुल गांधी यांचे स्टेटस ठेवलं म्हणून मुलींना धमकावण्याचा आणि त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्याचा अधिकार अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या गुंडांना कोणी दिला आहे? असा प्रश्नही हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी उपस्थित केला.विचारांचा सामना विचारांनी करता येत नाही म्हणून मारहाण, धमकी आणि दहशतीचा मार्ग स्वीकारायचा हीच भाजपच्या विद्यार्थी राजकारणाची संस्कृती आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झालं आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या या गुंडांना सरकारचं संरक्षण आहे का? असेल तर विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आणि मुलींच्या स्वातंत्र्यावर हल्ला करणाऱ्या गुंडगिरीसमोर काँग्रेस कधीही झुकणार नाही अस यावेळी त्यांनी सांगितले.

## हयात शेतकऱ्याला महसूलने दाखवले मृत

अकोले - साकीरवाडी येथील ८२ वर्षीय वृद्ध शेतकरी बाबू भाऊ भांगरे यांना हयात असतानाही महसूल अभिलेखात मृत दाखवून त्यांच्या मालकीची शेतजमीन परस्पर अन्य व्यक्तींच्या नावे करण्यात आल्याचा गंभीर आरोप भांगरे कुटुंबीयांनी केला आहे. महसूल यंत्रणेतील संबंधित अधिकाऱ्यांना हाताशी धरून हा प्रकार करण्यात आल्याचा दावा करत, चुकीच्या नोंदी तातडीने रद्द करून जमीन मूळ मालक व कायदेशीर वारसांच्या नावे सरकारी खर्चाने पूर्ववत करावी, अशी मागणी महसूलमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. आठ दिवसांत कार्यवाही न झाल्यास तहसीलदार कार्यालयासमोर कुटुंबासह उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

साकीरवाडी येथील बाबू भाऊ भांगरे यांच्या नावावर क्षेत्र खाते क्रमांक १८९ असून सामायिक खाते क्रमांक ५७ आहे. त्यांच्या मालकीचे सुमारे ४ हेक्टर ७५ आर क्षेत्र असल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे, गावात 'बाबू भाऊ भांगरे' या नावाचे तीन व्यक्ती असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या नावातील साधर्म्याचा गैरफायदा घेत महसूल अभिलेखात चुकीच्या पद्धतीने फेरबदल करण्यात आल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे.

शेतजमिनीचे उतारे काढल्यानंतर हा धक्कादायक प्रकार कुटुंबीयांच्या निदर्शनास आला. त्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या मालकीची जमीन ओम बबन भांगरे, भाऊ बबन भांगरे, मंगल बबन भांगरे, संगीत बबन भांगरे आणि संगीता बबन भांगरे यांच्या नावे करण्यात आली आहे. याबाबत कुटुंबीयांनी संबंधित तलाठी प्रीती घिगे यांची भेट घेऊन नोंदीबाबत विचारणा केली. माझे वडील हयात असताना त्यांना मृत दाखविण्यात आले. आम्ही त्यांचे कायदेशीर वारस असताना आमच्या जमिनीची नोंद परस्पर अन्य व्यक्तींच्या नावे कशी करण्यात आली? असा संतप्त सवाल भांगरे कुटुंबीयांनी उपस्थित केला आहे. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देऊन प्रकरण कळविण्याचे तलाठी यांनी सांगितल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. दरम्यान, जमीन ज्या व्यक्तींच्या नावे करण्यात आली आहे, त्यांच्याविरोधातही वरिष्ठ कार्यालयाकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणाची महसूल प्रशासनाने निष्पक्ष व तातडीने चौकशी करून महसूल अभिलेखातील चुकीच्या नोंदी रद्द कराव्यात, तसेच जमीन मूळ मालक व त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावे पूर्ववत करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. महसूल प्रशासनाकडे आम्ही तक्रार दाखल केली आहे. आठ दिवसांत आमची जमीन पुन्हा आमच्या नावे करण्यात आली नाही, तर कुटुंबासह तहसीलदार कार्यालयासमोर उपोषण सुरू करू, असा इशारा वृद्ध शेतकरी बाबू भांगरे यांनी दिला आहे.












# महामार्ग भूसंपादनावर हायकोर्टाचा दणका

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - सुरत-नाशिक-अहिल्यानगर ग्रीनफिल्ड राष्ट्रीय महामार्गासाठी संगमनेर तालुक्यातील वडझरी बु., तळेगाव, जुनेगाव, शहादतपूर, मिरपूर, वडझरी खुर्द आदी गावांतील संपादित जमिनींच्या भूसंपादनाबाबत प्रशासनाने घोषित केलेल्या अंतिम निवाड्यांवर मुंबई उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याने संबंधित शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या वाढीव व न्याय्य मोबदल्यासाठीच्या लढ्याला बळ मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

सुरत-नाशिक-अहिल्यानगर ग्रीनफिल्ड राष्ट्रीय महामार्गासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनींच्या मोबदल्यासंदर्भात उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकाऱ्यांनी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ मधील कलम ३ (जी) अंतर्गत अंतिम निवाडे घोषित केले होते. मात्र, हे निवाडे शेतकऱ्यांसाठी अन्यायकारक असल्याचा आरोप संबंधित शेतकऱ्यांनी केला आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, निवाड्यात मंजूर करण्यात आलेली मोबदला रक्कम प्रत्यक्ष अदा करण्यास विलंब झाला. प्रशासनाकडून १३ मे २०२६ रोजी पेमेंट नोटिसा देण्यात आल्या; मात्र कायद्यानुसार देय असलेले संबंधित कालावधीचे व्याज देण्यात आले नसल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. तसेच जमिनीचे बाजारमूल्य निश्चित करताना २४ जानेवारी २०२३ रोजीच्या शासन आदेशानुसार खरेदी-विक्री व्यवहारांचा विचार करण्यात आल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. संबंधित शासन आदेशासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. त्यामुळे बाजारमूल्य निश्चितीची प्रक्रिया आणि अंतिम निवाड्यांबाबत शेतकऱ्यांनी आक्षेप घेतला.

# जिल्हा बँकेच्या पाच संचालकांना तिसऱ्यांदा निवडणुकीची संधी ?

## घुले, गायकर, पिसाळ, म्हस्के, तनपुरे पुन्हा मैदानात उतरण्याची शक्यता




### पाच दिग्गजांच्या उमेदवारीकडे लक्ष

**अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सीताराम पाटील गायकर, अंबादास पिसाळ, अण्णासाहेब म्हस्के, अरुण तनपुरे आणि चंद्रशेखर घुले या पाच संचालकांनी सलग दहा वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला आहे. त्यामुळे नव्या कायद्यानुसार या पाचही संचालकांना आगामी निवडणूक लढविता येणार नाही, अशी चर्चा सुरू होती. मात्र, शासनाच्या संभाव्य धोरणात्मक भूमिकेमुळे आता या पाचही जणांच्या उमेदवारीचा मार्ग पुन्हा खुला होण्याची शक्यता आहे.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर: राज्यातील सहकारी बँकांच्या संचालकांना सलग दोन टर्मनंतर पुन्हा निवडणूक लढविण्यावर असलेली बंदी उठविण्याच्या हालचालींना वेग आला आहे. विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानंतर या निर्णयाबाबतची चर्चा जोर धरू लागली असून, त्याचा थेट परिणाम अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीवर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सलग दहा वर्षे संचालकपद भूषविलेल्या चंद्रशेखर घुले यांच्यासह पाच संचालकांना तिसऱ्यांदा निवडणूक लढविण्याचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

सहकारी बँकांमधील संचालकांची दीर्घकाळची मक्तेदारी रोखण्यासाठी केंद्र सरकारने बँकिंग नियमन कायद्यात सुधारणा केली होती. त्यातील कलम १०-अनुसार जिल्हा व नागरी सहकारी बँकेत सलग दहा वर्षे किंवा त्याहून अधिक काळ संचालक राहिलेल्या व्यक्तीला पुढील निवडणूक लढविण्यास निर्बंध घालण्यात आले होते. त्यामुळे दहा वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर संबंधित संचालकाने किमान एक टर्म निवडणुकीपासून दूर राहणे अपेक्षित होते.

मात्र, या तरतुदीबाबत सहकार क्षेत्रासह राजकीय वर्तुळात नाराजी व्यक्त होत होती. नुकत्याच काही जिल्हा बँकांच्या निवडणुकांमध्येही या तरतुदीच्या अंमलबजावणीवरून प्रश्नचिन्ह निर्माण झाले. राज्याच्या सहकार कायद्यात आवश्यक त्या सुधारणा केल्याशिवाय दहा वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केलेल्या संचालकांना पुन्हा निवडणुकीपासून रोखता येणार नसल्याची भूमिका शासन स्तरावर मांडली जात असल्याची चर्चा आहे. त्यामुळे दहा वर्षे पूर्ण झाली असली तरी संबंधित संचालकांना तिसऱ्यांदा निवडणूक लढविण्याची संधी मिळू शकते, अशी शक्यता व्यक्त होत आहे.

दरम्यान, निवडणूक लढविता येणार नसल्याच्या शक्यतेमुळे काही संचालकांनी पर्यायी राजकीय समीकरणांची तयारी सुरू केल्याचेही दिसून येते. अरुण तनपुरे यांनी स्वतःऐवजी पुत्र हर्ष तनपुरे आणि पत्नी सुजाता तनपुरे यांच्या नावाचे ठराव केले आहेत. अंबादास पिसाळ यांनीही स्वतःचा ठराव न घेता पत्नी सुनंदा आणि मुलगा तुषार पिसाळ यांच्या नावाचे ठराव केले आहेत.

दुसरीकडे, चंद्रशेखर घुले यांनी पत्नी राजश्री घुले यांचा ठराव घेतानाच स्वतःचाही ठराव घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. अण्णासाहेब म्हस्के आणि सीताराम गायकर यांच्या नावांचा ठरावात समावेश नसल्याचे दिसून येते.

मात्र, ठरावात नाव नसले तरी संबंधित संस्था बँकेची सभासद असल्यास आणि इतर पात्रता पूर्ण होत असल्यास ओबीसी प्रवर्गातून निवडणूक लढविण्याची संधी मिळू शकते, अशीही शक्यता व्यक्त केली जात आहे.

त्यामुळे शासनाच्या अंतिम भूमिकेकडे आता संपूर्ण सहकार क्षेत्राचे लक्ष लागले असून, दहा वर्षांची मर्यादा पूर्ण केलेल्या संचालकांना पुन्हा संधी मिळणार की नव्या चेहऱ्यांना संधी मिळणार, याचा फैसला आगामी काळात होणार आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील पुढील राजकीय समीकरणेही या निर्णयावर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणार आहेत.

# पान १ वरून - एका लेकीने आईला वाचवलं...

माहीतही नाही. पण या दोन घटनांनी आपल्या समोर दोन वेगवेगळे संदेश नक्कीच ठेवले आहेत. एका ठिकाणी संकटाच्या क्षणी मुलगी स्वतःच्या भीतीवर मात करून आईसाठी उभी राहते; दुसऱ्या ठिकाणी एका कौटुंबिक वादाने एवढं टोक गाठलं की पालकांनी आपल्या मुलाला वाचवताना स्वतःचे प्राण गमावले.

म्हणूनच या दोन्ही घटनांकडे पाहताना दोष कोणाचा, चूक कोणाची, यापेक्षा आपण काय शिकणार हा प्रश्न महत्त्वाचा आहे. मुलांना केवळ चांगले शिक्षण, चांगले कपडे, महागडे मोबाईल आणि सुखसोयी देऊन पालकांची जबाबदारी संपत नाही. त्यांना अपयश पचवायला शिकवावे लागते, नकार स्वीकारायला शिकवावे लागते, इच्छा आणि गरज यातील फरक समजावून सांगावा लागतो आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे भावनेच्या भरात घेतलेला एक निर्णय संपूर्ण आयुष्य बदलू शकतो, हे त्यांच्या मनावर बिंबवावे लागते.

आज मुलांना भविष्यासाठी तयार करताना त्यांच्या करिअरची काळजी घेतो, त्यांच्या गुणांची काळजी घेतो, त्यांना कोणत्या क्षेत्रात पुढे नेता येईल याचा विचार करतो. पण त्याचबरोबर त्यांच्या भावनिक जगाचीही काळजी घेण्याची गरज आहे. त्यांना मनातलं बोलता येतं का? त्यांना नकार मिळाल्यावर ते पालकांशी मोकळेपणाने बोलू शकतात का? त्यांना अडचण आली तर ते मदत मागतील याची खात्री आपल्याला आहे का? आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, कितीही मोठी अडचण आली तरी 'यातूनही मार्ग निघू शकतो' असा विश्वास त्यांच्या मनात आपण निर्माण केला आहे का?

एखादा हट्ट आज पूर्ण झाला नाही तर उद्या पूर्ण करता येतो. पण गेलेले जीव परत आणता येत नाहीत. एका क्षणाच्या भावनेतून घेतलेला निर्णय कधी कधी केवळ स्वतःचेच नव्हे, तर आपल्यावर जीवापाड प्रेम करणाऱ्या अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त करू शकतो.

आणि म्हणूनच या दोन घटना आपल्याला पालकत्वाचा एक अत्यंत कठीण पण आवश्यक धडा देतात. मुलांना सुख द्यायचं, त्यांच्या इच्छा पूर्ण करायच्या, त्यांच्यासाठी आयुष्य झिजवायचं हे पालकांचं प्रेम आहेच. पण त्या प्रेमाला शहाणपणाची जोड देणंही तितकंच महत्त्वाचं आहे. मुलांच्या प्रत्येक मागणीला होकार देणे म्हणजे प्रेम नाही; तर योग्य वेळी त्यांच्या हाताला धरून त्यांना योग्य दिशा देणे म्हणजे प्रेम. कधी त्यांना जवळ घेणे, कधी समजावणे आणि कधी ठामपणे 'नाही' म्हणणेही पालकत्वाचाच भाग आहे.

दुसरीकडे मुलांनीही आपल्या आई-वडिलांकडे केवळ आपल्या इच्छा पूर्ण करणाऱ्या व्यक्ती म्हणून पाहू नये. त्यांच्या क्षमतेचा, परिस्थितीचा आणि भावनांचा विचार करायला शिकले पाहिजे. ज्यांनी आपल्यासाठी आयुष्यभर त्याग केला, त्यांच्यापेक्षा कोणतीही वस्तू मोठी नाही. चिपळूण आणि छ. संभाजीनगर येथील दोन्ही घटनांमध्ये प्रेम आहे, नातं आहे, माया आहे; पण त्यातून समोर येणारा प्रश्न आपल्या प्रत्येक घरासाठी आहे. आपण आपल्या मुलांना फक्त जगण्याच्या सुखसोयी देत आहोत की जगण्याची ताकदही देत आहोत?

कारण संकट कधी सांगून येत नाही. आयुष्य कधी कोणता प्रश्न विचारेल हेही माहीत नसतं. पण त्या क्षणी मन स्थिर ठेवून निर्णय घेण्याची ताकद, आपल्या माणसांसाठी उभं राहण्याची भावना आणि परिस्थिती कितीही कठीण असली तरी त्यातून मार्ग निघू शकतो, हा विश्वास जर मुलांच्या मनात आपण रुजवला असेल, तर कदाचित तीच खरी पालकांची कमाई असेल.

एका लेकीने आईचा जीव वाचवला आणि दुसऱ्या घटनेत एका हट्टाने कुटुंब उद्ध्वस्त झालं. या दोन बातम्या उद्या कदाचित जुन्या होतील; पण त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न जुने होता कामा नयेत. कारण मुलांच्या हातात आपण मोबाईल देतोय; पण त्याच वेळी त्यांच्या मनात आयुष्याची किंमतही रुजवतोय का, हा प्रश्न प्रत्येक पालकाने आणि प्रत्येक कुटुंबाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.

# संगमनेरात इंदिरानगरच्या राजाचे आगमन

## लालबागच्या राजाची भव्य प्रतिकृती विराजमान होणार



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर-

संगमनेर शहरातील इंदिरानगर परिसरात यंदाचा गणेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा होणार असून, छत्रपती हिंदू तरुण मित्र मंडळाच्या वतीने 'लालबागच्या राजाची' भव्य प्रतिकात्मक मूर्तीची स्थापना करण्यात येणार आहे. मुंबईतील परळ येथून या मूर्तीचे संगमनेरात मोठ्या उत्साहात आगमन झाले. मुंबईतील परळ येथील प्रसिद्ध मूर्तिकार सुशांत पोहेकर यांनी साकारलेली, नवसाला पावणारा गणराय म्हणून प्रसिद्ध असलेल्या लालबागच्या राजाची भव्य प्रतिकृती संगमनेरात आणण्यात आली. मूर्तीच्या आगमनावेळी भक्तांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला.

गणेश चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर या भव्य मूर्तीची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. यावेळी ढोल-ताशांचा गजर, पारंपरिक वाद्यांचे सूर आणि भव्य मिरवणुकीने गणरायाचे स्वागत करण्यात येणार असल्याने इंदिरानगर परिसरात भक्तिमय आणि उत्साहाचे वातावरण निर्माण होणार आहे. दहा दिवस चालणाऱ्या या गणेशोत्सवात विविध सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गणेशभक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन उत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. गणेशोत्सव यशस्वी आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यासाठी मंडळाचे मार्गदर्शक विश्वास निसाळ, अजय नाकील, अध्यक्ष ओम रवींद्र नाकील, तसेच प्रसाद डोंगरे, सार्थक वाघमारे, प्रथमेश नाकील, सूरज नाकील, आदित्य वैष्णव, आदित्य नाकील, विशाल बर्डे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

# नीट-नेट गोंधळ का ? : मूळ रोगावर उपचार होण्याची आवश्यकता

सध्या एनटीएतर्फे घेण्यात आलेल्या नीट या राष्ट्रीय पात्रता परीक्षेतील प्रश्नपत्रिका रद्द करून पुनर्परीक्षा घेण्याच्या निर्णयावर सर्वत्र चर्चा होत आहे. प्रश्नपत्रिकांमध्ये आढळलेल्या गंभीर चुका, त्रुटी, विसंगतींमुळे पुन्हा एकदा परीक्षेच्या विश्वासार्हतेचा विषय देशभरात चर्चेत आला आहे. देशातील विविध राज्यांमध्ये, विविध विषयांच्या प्रश्नपत्रिका फुटण्याच्या घटना, छएढ परीक्षेतील प्रश्नपत्रिकांमधील चुकीची भाषांतरे, पुस्तकांच्या नावांमध्ये झालेल्या चुका, व्याकरणातील चुका, चुकीची विरामचिन्हे, महत्त्वाच्या व्यक्तींच्या नावांमध्ये आढळलेल्या त्रुटी अशा अनेक बाबी निदर्शनास आल्या. या सगळ्यामुळे परीक्षा रद्द करून पुन्हा परीक्षा घेण्याची वेळ आली.

नुकतेच NEET परीक्षेतील पेपरफुटी आणि त्यानंतर झालेले आंदोलन यावरील वाद अजून ताजा असतानाच, देशातील विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या परीक्षांमध्ये झालेल्या गोंधळामुळे परीक्षा रद्द करण्याची किंवा पुन्हा घेण्याची वेळ येत आहे.



या सगळ्या घटनांमागे चाललेले राजकारण, आरोप-प्रत्यारोप, पक्षीय भूमिका काही काळ बाजूला ठेवून आपण या प्रश्नाकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे. कारण हा केवळ परीक्षेतील चुका किंवा प्रशासनातील निष्काळजीपणाचा विषय नाही. हा आपल्या समाजाच्या विचार करण्याच्या पद्धतीशी, मूल्यांशी, विशेषतः शिक्षणासारख्या अत्यंत पवित्र क्षेत्रात शिरलेल्या काही अपप्रवृत्तींशी संबंधित गंभीर प्रश्न आहे. हे केवळ निष्काळजीपणाचे प्रकरण नाही. 'आपल्याला काय त्याचे?', 'कोणाला काय फरक पडणार?' किंवा 'आपले काम झाले म्हणजे झाले!'... अशी बेफिकीर वृत्ती, वाढता अहंकार, जबाबदारीकडे दुर्लक्ष करण्याची सवय हळूहळू मनोवृत्तीचा भाग बनत चालल्याचे दिसते. या वृत्तीच्या मुळाशी स्वार्थ, भ्रष्ट मानसिकता, कर्तव्यापेक्षा स्वतःच्या फायद्याला दिले जाणारे महत्त्व या गोष्टी दिसतात.. मात्र, अशा वृत्तीचा फटका बसतो तो एखाद्या व्यक्तीला नव्हे, तर हजारो विद्यार्थ्यांच्या मेहनतीला, त्यांच्या भविष्याला आणि संपूर्ण परीक्षा व्यवस्थेवरील विश्वासाला.

शिक्षण हे केवळ नोकरी मिळवण्याचे साधन नाही. शिक्षण म्हणजे व्यक्ती घडवण्याची, समाज घडवण्याची प्रक्रिया. त्यामुळे या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडून प्रामाणिकपणा, जबाबदारीची जाणीव, कर्तव्यनिष्ठा, संवेदनशीलता अपेक्षित असते. मात्र, काही ठिकाणी पदावर असलेल्या व्यक्तींमध्ये वाढत चाललेला निष्काळजीपणा, पैशाची प्रचंड हाव, जबाबदारी टाळण्याची वृत्ती, आपल्या कृतीचा, कामाचा समाजावर होणारा परिणाम समजून न घेण्याची मानसिकता दिसून येते. अशा वृत्तीमुळे हजारो विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात येत आहे.

आपल्या देशात आजही शिक्षण क्षेत्रामध्ये अत्यंत प्रामाणिकपणे काम करणारे असंख्य शिक्षक, अधिकारी, कर्मचारी आहेत. विद्यार्थ्यांसाठी आयुष्य झोकून देणारी अनेक चांगली माणसे आहेत. त्यामुळे काही मोजक्या विकृत विचारांच्या किंवा भ्रष्ट मानसिकतेच्या व्यक्तींमुळे संपूर्ण शिक्षण क्षेत्राकडे संशयाने पाहणे योग्य ठरणार नाही. पण, या क्षेत्रातील महत्त्वाच्या पदांवर बसलेल्या काही व्यक्तींमुळे अशा अक्षम्य चुका वारंवार घडत असतील, तर त्याकडे दुर्लक्ष करणेही तितकेच धोकादायक आहे. शिक्षण क्षेत्रात लागलेली ही 'वाळवी' वेळेत ओळखून तिच्यावर कठोर उपाय करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी केवळ दोषींवर कारवाई करून भागणार नाही. या घटनांच्या मुळाशी असलेल्या मानसिकतेचाही विचार करावा लागेल.

येथे एक गोष्ट अत्यंत स्पष्टपणे नमूद करावीशी वाटते की ज्या व्यक्ती भ्रष्टाचार, पेपरफुटी, गैरप्रकार किंवा विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या कृत्यांमध्ये दोषी आढळतील, त्यांची योग्य पद्धतीने ओळख करून त्यांच्यावर कायद्यानुसार अशी कठोर कारवाई झाली पाहिजे, की पुन्हा असे कृत्य करण्याचे धाडस कोणालाही होणार नाही. केवळ निलंबन, बदली किंवा काही काळाची चौकशी करून हा प्रश्न संपता कामा नये. दोष सिद्ध झाल्यास शिक्षेचा स्पष्ट आणि कठोर संदेश समाजात जाणे आवश्यक आहे.

त्याचबरोबर, प्रत्येक शैक्षणिक संस्था, विद्यापीठ, परीक्षा मंडळ इत्यादी संबंधित विभागानेही आपल्या संस्थेतील भ्रष्ट किंवा अनैतिक प्रवृत्तीच्या व्यक्तींना वेळीच ओळखण्यासाठी स्वतंत्र प्रभावी यंत्रणा उभी करणे गरजेचे आहे. गैरप्रकाराची शंका निर्माण झाल्यास त्याची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे आणि दोष आढळल्यास संस्थेच्या पातळीवरही कठोर शिस्तभंगाची कारवाई झाली पाहिजे. एखादी व्यक्ती मोठ्या पदावर आहे म्हणून तिच्याकडे दुर्लक्ष होऊ नये. उलट, पद जितके मोठे, तितकी जबाबदारी अधिक त्यामुळे गैरप्रकार सिद्ध झाल्यास कारवाईही तितकीच कठोर असली पाहिजे.

या सगळ्या प्रश्नांचे एक महत्त्वाचे मूळ म्हणजे कमी कष्टात जास्त पैसा मिळवण्याची मानसिकता. एखाद्या पदापर्यंत पोहोचण्यासाठी विविध मार्गांचा वापर करणे, पद मिळाल्यानंतर कोणत्याही मार्गाने पैसा कमावण्याची इच्छा बाळगणे, ही प्रवृत्ती केवळ शिक्षण क्षेत्रापुरती मर्यादित राहिलेली नाही. समाजातील अनेक क्षेत्रांमध्ये तिचे प्रतिबिंब दिसते. पैसा कमावणे चुकीचे नाहीपण पैसा मिळवण्यासाठी नैतिकता, प्रामाणिकपणा, कर्तव्य यांचा बळी देणे निश्चितच घातक आहे.

सरकारला धारेवर धरून, नवनवीन कायदे करून किंवा कठोर नियम लागू करून या गोष्टींना काही प्रमाणात आळा घालता येईल. दोषींवर कठोर कारवाईही आवश्यक आहे. परंतु, केवळ कायदे करून मानसिकता बदलणार आहे का? समाजातील प्रत्येक क्षेत्रात हळूहळू पसरत चाललेल्या या 'रोगावर' खरा उपाय काय, याचा विचार आपण कधी करणार आहोत?

दीर्घकालीन सुदृढ समाज बनवण्यासाठी त्याची मानसिकता बदलायची तरयाचे उत्तर पुन्हा आपल्या घरापासूनच सुरू होते संस्कार.

मुलांना आपण काय शिकवतो?...प्रामाणिकपणे मेहनत करण्यापेक्षा शॉर्टकटने यश मिळवणे महत्त्वाचे आहे, असे नकळत आपण त्यांच्या मनावर बिंबवत आहोत का?..अधिकाधिक पैसा, प्रसिद्धी आणि प्रतिष्ठा मिळवण्याची धडपडच जीवनाचे अंतिम उद्दिष्ट आहे, असा संदेश आपण त्यांना देत आहोत का?.. आपल्या वागण्यातून आपण आपल्या मुलांसमोर, समाजासमोर काय आदर्श निर्माण करतो याची जाणीव आई-वडिलांना आहे का?... सोशल मीडियावर सतत दिसणारे झटपट प्रसिद्धी मिळवणारे चेहरे, अल्पावधीत मिळणारे यश, भौतिक सुखांचे प्रदर्शन यांचा आपल्या विचारसरणीवर किती परिणाम होत आहे, याचाही गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

म्हणूनच, मुलांच्या जडणघडणीच्या काळात वयाच्या १६ वर्षांपर्यंत सोशल मीडियाचा वापर अत्यंत मर्यादित ठेवणे किंवा शक्य असल्यास टाळणे, हा देखील एक महत्त्वाचा सामाजिक विचार ठरू शकतो. मुलांना सतत तुलना, प्रसिद्धी, आभासी यशाच्या जगात ढकलण्याऐवजी वाचन, खेळ, प्रत्यक्ष संवाद, सर्जनशीलता, जबाबदारीची जाणीव याकडे वळवणे गरजेचे आहे. त्याचबरोबर स्वशिस्त हा विषय केवळ पुस्तकात शिकवून चालणार नाही ती घरात, शाळेत जगावी लागेल. वेळेचे भान, अभ्यासातील सातत्य, प्रामाणिकपणा, स्वतःच्या चुका मान्य करणे, दिलेले काम पूर्ण करणे, चुकीचा शॉर्टकट न स्वीकारणे, या छोट्या सवयी बालपणापासून रुजवल्या पाहिजेत. पालक, शिक्षकांनी स्वतःच्या वर्तनातून हा आदर्श मुलांसमोर ठेवला, तर त्याचा परिणाम अधिक प्रभावी होईल.

कष्ट, संयम, प्रामाणिकपणा, सातत्य यांना मिळणारे महत्त्व कमी होत गेले.आणि झटपट पैसा, प्रसिद्धी व यश यांना अधिक महत्त्व मिळाले, तर समाजाची मानसिकता हळूहळू बदलणारच आणि हीच बदललेली मानसिकता जेव्हा शिक्षणासारख्या संवेदनशील क्षेत्रात प्रवेश करते, तेव्हा त्याचे परिणाम अत्यंत गंभीर होतात.. जे आता आपल्याला दिसत आहेत.. अनुभवतोय

यावर तातडीने तीन पातळ्यांवर उपाय आवश्यक आहेत

१. परीक्षा व्यवस्थेत बहुपदरी तपासणी व तंत्रज्ञानाधारित पारदर्शकता, दोषींवर निश्चित वेळबद्ध कारवाई

२. शालेय स्तरापासून नैतिक शिक्षण

३. स्वयंशिस्तीवर भर

यामुळे केवळ चुका रोखल्या जाणार नाहीत, तर जबाबदारीची संस्कृतीही निर्माण होईल. प्रश्न केवळ एका परीक्षेचा नाही. प्रश्न एका चुकीच्या प्रश्नपत्रिकेचा नाही. प्रश्न एका अधिकाऱ्याच्या निष्काळजीपणाचाही नाही. प्रश्न आहे तो आपल्या समाजाच्या सामूहिक मानसिकतेचा. ही मानसिकता बदलण्यासाठी घरातून, शाळेतून, महाविद्यालयातून, समाजातून सातत्याने प्रयत्न करावे लागतील. प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, जबाबदारी यांना पुन्हा प्रतिष्ठा मिळवून द्यावी लागेल. शिक्षण क्षेत्रातील चांगली माणसे पुढे यावीत, चुकीच्या प्रवृत्तींना वेळीच रोखले जावे, यासाठी समाजानेही जागरूक राहणे आवश्यक आहे. कारण परीक्षा रद्द होणे, पुन्हा परीक्षा घेणे किंवा एखाद्या अधिकाऱ्यावर कारवाई होणे, हा या समस्येचा शेवट नाही. खरा प्रश्न आहे पुढच्या पिढीसमोर आपण कोणता आदर्श ठेवणार आहोत? जोपर्यंत या मानसिकतेवर ठोस, सातत्यपूर्ण उपचार होत नाहीत, तोपर्यंत अशा घटना पुन्हा पुन्हा घडण्याची शक्यता राहणारच. म्हणूनच, आता केवळ गोंधळावर चर्चा करण्याची नव्हे, तर या गोंधळाच्या मुळाशी जाऊन त्यावर उपचार करण्याची वेळ आली आहे. शिक्षण क्षेत्र स्वच्छ, पारदर्शक, विश्वासार्ह ठेवणे ही केवळ सरकारची जबाबदारी नाही ती आपणा सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे असं वाटतं..

**सुहास बेलापूरकर**
**मुंबई, मो. ९८९२५१६८१०**

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे
मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे
मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# माती आणि पाणी संवर्धन ही काळाची गरज - जिल्हाधिकारी



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- माती आणि पाणी ही आपली अमूल्य नैसर्गिक संपत्ती असून त्यांचे संवर्धन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांनी 'पाणी अडवा, पाणी जिरवा'चा दिलेला संदेश आजच्या काळात अधिक महत्त्वाचा ठरत आहे. भविष्यातील पिढ्यांसाठी जलसुरक्षित आणि समृद्ध महाराष्ट्र घडविण्यासाठी माती व पाणी संवर्धनाची लोकचळवळ उभी करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

राज्य शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने माती व पाणी संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी आयोजित 'महा वॉकॅथॉन - वॉक फॉर वॉटर' उपक्रमात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया बोलत होते. यावेळी महापौर श्रीमती ज्योती गाडे, नगरसेवक श्री ऋग्वेध गंधे, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा जलसंधारण अधिकारी पांडुरंग गायसमुद्रे, उपवनसंरक्षक श्री सालविठ्ठल, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी श्री मुळीक, जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत, जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. खुरांगे, माध्यमिक शिक्षणाधिकारी श्रीमती गायकवाड, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी चित्रकला, निबंध तसेच वादविवाद स्पर्धेचे बक्षिस वितरण देखील यावेळी उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, आज आपण पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविला, तरच उद्याची पिढी सुरक्षित राहील. त्यामुळे माती आणि पाणी संवर्धनाचा संदेश केवळ एका दिवसापुरता मर्यादित न ठेवता तो आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवूया, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी यावेळी केले. 'वॉक फॉर वॉटर' या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जलसंधारण, पाणी बचत, मृदसंधारण आणि पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. सहभागी नागरिकांनी माती व पाणी संवर्धनाचे संदेश देणारे फलक हातात घेत जनजागृती केली. पाण्याचा अपव्यय टाळणे, पावसाचे पाणी साठवणे, वृक्षलागवड करणे, जलस्त्रोतांचे संरक्षण करणे आणि मातीची धूप रोखणे याबाबत नागरिकांना संदेश देण्यात आले. कार्यक्रमाच्या माध्यमातून 'माती वाचवा, पाणी वाचवा आणि भविष्य सुरक्षित करा' हा संदेश नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आला.

# डेरे स्कूलमध्ये 'एक राखी सैनिकांसाठी' उपक्रम



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : रक्षाबंधनानिमित्त देशाच्या सीमेवर अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी डॉ. भानुदास जी. डेरे इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये 'एक राखी सैनिकांसाठी' उपक्रम उत्साहात पार पडला. संगम सेवाभावी संस्थेच्या संचालिका सौ. अंकिता श्रीराज डेरे तसेच स्वराज्य सैनिक कल्याण संस्थेचे अध्यक्ष व माजी सैनिक प्रकाश कोटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. यावेळी उपस्थित माजी सैनिकांचा गुलाबाचे रोप देऊन सन्मान करण्यात आला. माजी सैनिकांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सैनिकांचे जीवन, देशसेवेतील योगदान आणि सीमेवरील आव्हानांची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी तसेच सौ. अंकिता डेरे यांनी माजी सैनिकांना राखी बांधली. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या राख्या स्वराज्य सैनिक कल्याण संस्थेकडे सुपूर्द केल्या, जेणेकरून त्या सीमेवरील जवानांपर्यंत पोहोचविता येतील.

यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर योग-नृत्य सादर केले. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. विशेष म्हणजे कमांडो तथा माजी सैनिक लक्ष्मण ढोले हे कारगिल युद्धात सहभागी झाले होते. त्यांच्या अनुभवातून विद्यार्थ्यांना सैनिकांच्या त्यागाची आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा मिळाली.

डेरे स्कूलमध्ये गेल्या पाच वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. यावर्षी स्वराज्य सैनिक कल्याण संस्थेच्या माध्यमातून तब्बल २५ हजार राख्या संकलित करून सैनिकांसाठी सीमेवर पाठविण्यात आल्या आहेत. संस्थेच्या वतीने सैनिकांसाठी विविध सामाजिक उपक्रमही राबविले जातात.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगीता घुले, पाहुण्यांची ओळख सुरेखा कोटकर यांनी करून दिली, तर आभार अर्चना सातपुते यांनी मानले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. भानुदास जी. डेरे, उपाध्यक्ष अ‍ॅड. श्रीराज भानुदास डेरे, प्राचार्य सुनीलकुमार शुक्ला, उपप्राचार्य हरजिंदर कौर बत्रा, शैक्षणिक प्रभारी प्रज्ञा कुलकर्णी, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# रानभाज्यांच्या पाककृती स्पर्धेत मवेशी विद्यालयाचे घवघवीत यश



राजूर - प्रतिनिधी श्री समर्थ माध्यमिक विद्यालय, मवेशी येथील विद्यार्थिनींनी नौरोजी गोदरेज वनस्पती संशोधन केंद्राच्या(सातारा )वतीने आयोजित करण्यात आलेल्या रानभाज्यांच्या पाककृती स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले.

या स्पर्धेत विद्यालयातील आदिती रघुनाथ भांगरे हिने अकोले तालुक्यात प्रथम क्रमांक, प्रांजल मच्छिंद्रनाथ बगाड हिने द्वितीय क्रमांक, तर आरती अजय कोंडार हिने तृतीय क्रमांक पटकावून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला.

रानभाज्यांच्या पाककृती तयार करण्यासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मंजूषा काळे त्यांच्या सहकारी शिक्षकांनी यांचे मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनींना रानभाज्यांचे पोषणमूल्य, पारंपरिक खाद्यसंस्कृती आणि पाककलेचे महत्त्व समजून घेण्याची संधी मिळाली.

तालुकास्तरीय स्पर्धेत मिळविलेल्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे सचिव शांतारामजी काळे, शरद कोंडार, भास्कर भांगरे ,मवेशी गावचे समस्त ग्रामस्थ तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मंजुषा काळे यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून करून शुभेच्छा दिल्या.

याच विद्यार्थिनींचा श्री समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, राजूर येथे सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव शांतारामजी काळे यांनी विद्यार्थिनींचे तसेच त्यांच्या पालकांचे विशेष कौतुक केले. विद्यार्थिनींनी विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि नाविन्यपूर्ण स्पर्धांमध्ये सातत्याने सहभागी व्हावे, आपल्या ज्ञानात भर घालावी आणि आपल्या पालकांसह विद्यालयाचे नाव उंचवावे, असे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक सतीश काळे , टकले सर, फापाळे सर, मुळे सर, साळवे सर तसेच माजी मुख्याध्यापक विलास महाले सर यांनीही विद्यार्थिनींचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# साखरेसाठी केंद्राचा निर्णय

नवी दिल्ली - सणासुदीचा हंगाम सुरू होण्यापूर्वीच सर्वसामान्य ग्राहकांना महागाईचा फटका बसू नये यासाठी केंद्र सरकारने आता मोठं पाऊल उचलले आहे. वाढत्या किमती आणि घटत चाललेल्या पुरवठ्याच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत बाजारात साखरेची उपलब्धता सुधारण्यासाठी सरकारने १० लाख मेट्रिक टन साखरेच्या शुल्कमुक्त आयातीला परवानगी दिल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या दोन महिन्यांत साखरेच्या दरात सुमारे ४० टक्क्यांची मोठी वाढ झाली आहे. असे असतानाच हा निर्णय घेण्यात आला असून सर्वसामान्य नागरिकांना यामुळे दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. सणासुदीच्या काळात देशांतर्गत मागणी पूर्ण करणे आणि बाजारातील किमतींवर नियंत्रण ठेवणे या उद्देशाने सरकारने हे पाऊल उचलल्याचे बोललं जात आहे.

नोकरीची सुवर्ण संधी
साई अर्पण भारत गॅस एजन्सी
कळस ता. अकोले, जि. अहिल्यानगर
अकाउंटंट (Accountant)
अनुभव: ३ ते ५ वर्षे, Tally Prime, MS Excel, Taxation, ज्ञान असणे आवश्यक
आकर्षक पगार दिला जाईल
संपर्क- +91 88056 47610
ईमेल- shilpapatolehr@gmail.com
इच्छूक उमेदवारांनी वरील क्रमांकावर संपर्क साधावा किंवा आपला बायोडाटा (Resume) ईमेलवर पाठवावा.

# मेजर सोमनाथ इल्हे यांचा प्रथम स्मृतिदिन सामाजिक उपक्रमांनी साजरा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आमचे बंधू स्व. मेजर सोमनाथ जनार्दन इल्हे यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त माऊली ज्ञानराज आध्यात्मिक गुरुकुल, त्र्यंबकेश्वर येथे विविध सामाजिक उपक्रम राबवून त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

माऊली ज्ञानराज आध्यात्मिक गुरुकुलमध्ये पालघर, नाशिक, धुळे, जळगाव, ठाणे तसेच पेठ-सुरगाणा यांसारख्या दुर्गम भागातील निराधार, गरजू व शेतकरी कुटुंबातील सुमारे ६० मुले निवासी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांसाठी इल्हे परिवाराच्या वतीने सुग्रास भोजनाची व्यवस्था करण्यात आली. तसेच सर्व विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाची उबदार ब्लँकेट भेट देण्यात आली. यावेळी सामाजिक बांधिलकी जपत त्र्यंबकेश्वर येथील स्वामी समर्थ गोशाळेसाठी ५ हजार रुपये, तळेगाव येथील पंढरपूर मठासाठी ११ हजार रुपये, तर गरजू व निराधार मुलांच्या शिक्षणासाठी कार्यरत असलेल्या आधार फाउंडेशन, संगमनेर या संस्थेसाठी ५ हजार रुपयांची देणगी देण्यात आली.

स्व. मेजर सोमनाथ इल्हे यांनी पोलीस खात्यात तब्बल २० वर्षे अत्यंत प्रामाणिकपणे सेवा बजावली. मात्र, तरुण वयातच अल्पशा आजाराने त्यांचे निधन झाले. त्यांच्या कार्याची आणि सामाजिक जाणिवेची आठवण कायम ठेवत इल्हे परिवाराने स्मृतिदिनाला सामाजिक उपक्रमांची जोड देत आगळ्या पद्धतीने अभिवादन केले. यावेळी इल्हे परिवारातील नातेवाईक, सगे-सोयरे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# शालेय अन्नसुरक्षेसाठी संगमनेरमध्ये विशेष कार्यशाळा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर शालेय विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ, पौष्टिक व संतुलित आहार मिळावा, तसेच शाळांमध्ये अन्नसुरक्षा मानकांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी, यासाठी पंचायत समिती संगमनेर शिक्षण विभागाच्या वतीने अन्न व औषध प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.संगमनेर महाविद्यालयातील साईबाबा हॉल येथे शुक्रवार, दि. २१ ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते दुपारी १ या वेळेत हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमास अन्न व औषध प्रशासनाचे उपायुक्त सूर्यवंशी, गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड ,संगमनेर महाविद्यालयाचे प्राचार्य गायकवाड सर, संगमनेर विद्या प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. राजेंद्र लड्डा शिक्षण विस्तार अधिकारी नंदा वलवे, शिक्षण विस्तार अधिकारी कैलास भागवत , सिद्धार्थ विद्यालयाचे मुख्याध्यापक जगताप सर, महिला व बाल विकास अधिकारी राऊत साहेब, संगमनेर ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य ढमक सर व वालझाडे सर यांच्यासह सर्व केंद्रप्रमुख, तालुक्यातील सर्व माध्यमांच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, ग्रामविकास अधिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षक तसेच खएऊ चे विशेष शिक्षक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कैलास भागवत यांनी केले. शिक्षण विस्तार अधिकारी नंदा वलवे यांनी प्रशासकीय कामकाजाचा आढावा घेतला. गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड यांनी शालेय पोषण आहाराच्या अनुषंगाने आवश्यक त्या काटेकोर सूचना देत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

अन्न व औषध प्रशासनाचे उपायुक्त सूर्यवंशी साहेब यांनी शाळांमध्ये अन्नसुरक्षा, पोषण आहाराची गुणवत्ता, स्वच्छता, अन्न हाताळणी, अन्नपदार्थांची सुरक्षित साठवणूक, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तसेच अन्नसुरक्षा नियमांचे पालन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. शाळांच्या परिसरात HFSS म्हणजेच जास्त चरबी, साखर व मीठ असलेल्या पदार्थांची विक्री, वितरण अथवा जाहिरात टाळण्याबाबतही त्यांनी स्पष्ट सूचना दिल्या. शाळांनी FSSAI नोंदणी, अन्नसुरक्षा प्रदर्शन फलक, स्वच्छता व आरोग्यविषयक बाबींची योग्य अंमलबजावणी करावी, यावर त्यांनी विशेष भर दिला.

उपायुक्त सूर्यवंशी साहेबांच्या मार्गदर्शनानंतर शिक्षक व मुख्याध्यापकांनी शालेय पोषण आहार, अन्नसुरक्षा नियम, FSSAI नोंदणी, शाळेतील खाद्यपदार्थांची गुणवत्ता तसेच प्रत्यक्ष अंमलबजावणीतील अडचणींबाबत विविध प्रश्न उपस्थित केले. या सर्व प्रश्नांना उपायुक्त साहेबांनी समर्पक उत्तरे देत शंका निरसन केले.

शाळांमध्ये विद्यार्थ्यांना सुरक्षित व संतुलित आहार मिळणे ही केवळ प्रशासकीय जबाबदारी नसून विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी निगडित महत्त्वाची बाब आहे. त्यामुळे शासनाच्या अन्नसुरक्षा व पोषणविषयक नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. शासनाच्या निर्देशांनुसार शाळांनी सुरक्षित, पौष्टिक व संतुलित अन्न सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करणे बंधनकारक असल्याचे परिपत्रकातही नमूद करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केंद्रप्रमुख अक्षय खतोडे यांनी केले तर आभार केंद्रप्रमुख रवींद्र अनाप यांनी मानले. कार्यशाळेसाठी उत्तम व्यवस्था शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.संजय मालपाणी यांनी केली.

# ईडीची धडक कारवाई

मुंबई (वृत्तसंस्था)

ऑनलाइन गेमिंग आणि बेटिंगच्या माध्यमातून कथित आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) नागपूर उप-क्षेत्रीय कार्यालयाने मोठी कारवाई केली आहे. आरोपी अनंत नवरत्न जैन ऊर्फ सोंटू जैन आणि त्याच्या सहकाऱ्यांशी संबंधित नागपूर, गोंदिया आणि अहमदाबाद येथील एकूण १२ ठिकाणांवर ईडीने १८ ऑगस्ट २०२६ रोजी छापेमारी केली. मनी लाँड्रिंग प्रतिबंधक कायद्यान्वये ही कारवाई करण्यात आली.ईडीच्या तपासानुसार, 'डायमंड एक्सचेंज डॉट कॉम', 'वोल्फ ७७७ डॉट कॉम' आणि 'वर्ल्ड ७७७ डॉट कॉम' यांसारख्या ऑनलाइन गेमिंग आणि बेटिंग प्लॅटफॉर्मचा कथित गैरवापर करून आर्थिक व्यवहार केले जात असल्याचा संशय आहे. या प्रकरणाच्या तपासादरम्यान करण्यात आलेल्या शोधमोहिमेत संशयितांच्या ठिकाणांहून रोकड तसेच अचल संपत्तीशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आली. कारवाईत ३० लाख ३० हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे. त्याचबरोबर १०० हून अधिक बँक खाती, म्युच्युअल फंड आणि शेअर्स गोठवण्यात आले.

## जाहीर समन्स नोटीस

पानोडी परिसर ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. पानोडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर या संस्थेने दाखल केलेले दाव्यातील कर्जदार व जामिनदार यांना दिनांक १३/०७/२०२६ रोजी या कार्यालयाकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये नोटीस देण्यात येवून दिनांक ३०/०७/२०२६, ११/०८/२०२६ व दिनांक १८/०८/२०२६ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. परंतु काही इसम सुनावणीस उपस्थित न राहील्याने त्यांना खालीलप्रमाणे जाहिर समन्स देण्यात येत आहे.

| अ.क्र. | दावा क्रमांक | कर्जदाराचे नाव | जामीनदाराचे नाव | पत्ता | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | ११०/२०२६ | श्री. हजारे सोपान देवराम, मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | श्री. हजारे दत्तू देवराम | मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | २,५५,८७५ |
| | | | श्री. साबळे सुकदेव कचरू | मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | |
| २ | १११/२०२६ | श्री. सानप नामदेव किसन, मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | श्री. सानप रावसाहेब भागा | मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | ६,११,४८० |
| | | | श्री. डोंगरे वसंत भिकू | मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | |
| ३ | ११२/२०२६ | श्री. सुळ रावसाहेब सखाराम, मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | श्री. ढोणे हौशीराम नामदेव | मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | ३,६१,८८० |
| | | | श्री. ढोणे संजय सावळेराम | मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | |
| ४ | ११३/२०२६ | श्री. खेडकर भिमराज सहादू, मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | श्री. घोडेकर विठ्ठल भाऊराव | मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | २,०५,९५७ |
| | | | श्री. खेडकर एकनाथ सहादू | मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | |
| ५ | ११४/२०२६ | सौ. विधाते अनिता अरूण, मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | श्री. कदम भास्कर दादा | मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | २,०६,५७६ |
| | | | श्री. कदम संदिप लक्ष्मण | मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | |
| ६ | ११६/२०२६ | श्री. हजारे बिरू जना, मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | श्री. हजारे लिंबाजी बिरू | मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | ५,९५,१०४ |
| | | | श्री. हजारे दादा रभा | मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | |
| ७ | ११७/२०२६ | श्री. सूळ गणेश कोंडाजी मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | श्री. सूळ आण्णा सखाहरी | मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | ३,०७,९४९ |
| | | | श्री. सूळ बबन विठोबा | मु.पो. पानोडी, ता. संगमनेर | |
| ८ | ११८/२०२६ | श्री. दातीर जनार्दन जयवंता मु.पो. पिंप्रीलोकी अजमपूर ता. संगमनेर | श्री. दातीर नवशीराम जयवंता | मु.पो. पिंप्रीलौकी अजमपूर ता. संगमनेर | २,६७,३३७ |
| | | | श्री. कदम संजय यव्हाण | मु.पो. पिंप्रीलौकी अजमपूर ता. संगमनेर | |

तरी वर नमुद प्रतिवादी यांनी सुचित करणेत येते की, आपण वर नमुद दाव्या बाबत दिनांक १/०९/२०२६ रोजी दु.१२.०० वाजता उपनिबंधक सहकारी संस्था, संगमनेर, यशवंतराव चव्हाण प्रशासकीय भवन, तिसरा मजला, नविन नगर रोड, संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर या कार्यालयात हजर राहावे. सदर दिवशी व वेळेत आपण हजर न राहील्यास अथवा लेखी म्हणणे आपण सादर न केल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व योग्य तो निर्णय देण्यात येईल.

**ठिकाण –** संगमनेर
**दिनांक –** १८/०८/२०२६

**(संतोष कोरे)**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, संगमनेर**

## संपादकीय...

# अत्याचारांच्या सावटाखाली समाज किती सुरक्षित ?

मानव हा पृथ्वीवरील सर्वांत बुद्धिमान प्राणी मानला जातो. विज्ञान, तंत्रज्ञान, वैद्यकीय क्षेत्र, शिक्षण आणि अंतराळ संशोधनात आपण अभूतपूर्व प्रगती केली आहे. मात्र या प्रगतीच्या प्रवासात एक प्रश्न आजही समाजाच्या विवेकबुद्धीला अस्वस्थ करतो-मानवतेला काळिमा फासणाऱ्या घटना थांबणार कधी? निरपराध बालकांवरील अत्याचार, महिलांवरील हिंसा, वृद्धांशी अमानुष वर्तन, कौटुंबिक छळ, जातीय द्वेष, लैंगिक गुन्हे आणि माणसाने माणसावर केलेल्या क्रौर्याच्या घटना वारंवार समोर येतात. प्रत्येक घटनेनंतर समाज संताप व्यक्त करतो, मोर्चे निघतात, कठोर शिक्षेची मागणी होते; पण काही दिवसांनी पुन्हा एखादी तितकीच हृदयद्रावक घटना घडते आणि आपण पुन्हा त्याच प्रश्नासमोर उभे राहतो. भारतातील राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरोच्या उपलब्ध आकडेवारीनुसार महिलांविरोधातील गुन्ह्यांची संख्या अजूनही चिंताजनक पातळीवर आहे. २०२४ मध्ये देशभरात ४.४१ लाखांहून अधिक महिलांविरोधातील गुन्हे नोंदवले गेले. ही केवळ आकडेवारी नसून त्यामागे लाखो कुटुंबांचे दुःख, असुरक्षितता आणि न्यायासाठी सुरू असलेला संघर्ष दडलेला आहे. बालकांच्या बाबतीत परिस्थिती अधिक संवेदनशील आहे. ज्यांना सुरक्षित बालपण, प्रेम आणि शिक्षणाची गरज आहे, त्यांच्यावरच हिंसा, लैंगिक अत्याचार, घरगुती छळ, तस्करी आणि ऑनलाइन शोषण यांसारखे गंभीर धोके निर्माण होत आहेत. युनिसेफनेही भारतात बालकांविरोधातील हिंसा ही व्यापक सामाजिक समस्या असल्याचे अधोरेखित केले असून घर, शाळा आणि समाज या सर्व स्तरांवर संरक्षणाची गरज व्यक्त केली आहे. या घटनांचे मूळ केवळ कायद्याच्या कमतरतेत शोधून चालणार नाही. समाजातील विकृत मानसिकता, स्त्री-पुरुष असमानता, नैतिक मूल्यांचा होत चाललेला ऱ्हास, हिंसेचे सामान्यीकरण आणि काही वेळा वाढती संवेदनाहीनता हीदेखील महत्त्वाची कारणे आहेत. एखादा गुन्हा घडल्यावर लोक सोशल मीडियावर संताप व्यक्त करतात; पण दैनंदिन जीवनात अन्याय, छेडछाड, कौटुंबिक हिंसा किंवा बालकांवरील संशयास्पद वर्तन दिसले तरी अनेकजण मौन बाळगतात. हे मौनच अनेकदा गुन्हेगाराला अप्रत्यक्ष बळ देते. कायदा कठोर असणे आवश्यक आहे, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे न्यायाची प्रक्रिया प्रभावी आणि वेळेत पूर्ण होणे. गुन्हेगाराला शिक्षा झाली पाहिजेच; मात्र पीडितेला सन्मानाने जगण्याची संधी, मानसिक आधार, सामाजिक स्वीकार आणि सुरक्षित वातावरण मिळणे तितकेच गरजेचे आहे. न्याय हा केवळ शिक्षा नसून पीडितेच्या पुनर्वसनाचाही विषय आहे. त्यामुळे पोलीस, न्यायव्यवस्था, सामाजिक संस्था आणि नागरिक यांची जबाबदारी परस्परपूरक आहे. शिक्षण व्यवस्थेची भूमिकाही येथे अत्यंत महत्त्वाची ठरते. शाळांमध्ये केवळ गुणांची स्पर्धा नव्हे, तर संवेदना, समानता, परस्पर आदर, संविधानिक मूल्ये आणि स्त्री-सन्मान यांचे संस्कार रुजवले गेले पाहिजेत. मुलांना लहानपणापासून 'नाही'चा अर्थ समजावून सांगणे, सुरक्षित आणि असुरक्षित स्पर्शाची जाणीव करून देणे, तसेच मुलींना निर्भय आणि मुलांना जबाबदार नागरिक बनवणे ही काळाची गरज आहे. संस्कार हे भाषणातून नव्हे तर घरातील वर्तनातून अधिक प्रभावीपणे घडतात. माध्यमांची जबाबदारीही तितकीच मोठी आहे. क्रूर घटनांचे वृत्तांकन करताना संवेदनशीलता जपली गेली पाहिजे. टीआरपी किंवा व्हायरल होण्याच्या स्पर्धेत पीडितेची ओळख, वेदना किंवा कुटुंबाचा सन्मान धोक्यात येणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. समाजाला केवळ धक्का देणे नव्हे, तर जागृत करणे ही पत्रकारितेची खरी भूमिका आहे. प्रत्येक बातमीसोबत प्रतिबंध, जनजागृती आणि कायदेशीर माहिती पोहोचवली तर माध्यमे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन बनू शकतात. मानवतेला काळिमा फासणाऱ्या घटना थांबवण्यासाठी शासनाकडून कठोर अंमलबजावणी, समाजाकडून जागरूक सहभाग आणि प्रत्येक व्यक्तीकडून नैतिक जबाबदारी आवश्यक आहे.

# राष्ट्रीय स्तरावर अमृतवाहिनीच्या विद्यार्थ्यांची गुणवत्तेची मोहोर




युवावार्ता (प्रतिनिधी)

महाराष्ट्राचे माजी शिक्षण मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली व विद्यालयाच्या संचालिका सौ शरयूताई देशमुख यांच्या संकल्पनेतून अमृतवाहिनी इंटरनॅशनल स्कूल मधील विद्यार्थी गुणवत्तेच्या बाबतीत सातत्याने देश व राज्य पातळीवर नावलौकिक मिळवत आहे. त्याचाच एक भाग म्हणून नुकत्याच झालेल्या विविध राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले असल्याची माहिती प्राचार्य जे बी सेठी यांनी दिली आहे.

यावाबत माहिती देताना त्या म्हणाल्या की, अमृतवाहिनी इंटरनॅशनल स्कूल ने कायम गुणवत्ता जपली आहे. म्हणूनच मंथन राज्यस्तरीय सामान्य ज्ञान परीक्षेत कु. अथर्व संजय पाटील ( इ ८ वी), अन्वी सिताराम कवडे ( इ ५ वी), राजवीर धनंजय गोरे ( इ. २ री), आरोही बाळासाहेब इरकर ( इ. २ री), प्रतीक विवेक कांडुरे (इ.२ री) यांनी घवघवीत यश मिळवले आहे.

तसेच नांदेड येथे आयोजित 'सप्तरंग कल्चरल फेस्टिवल' या राष्ट्रीय स्तरावरील या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत म्युझिक ग्रुप प्रकारात अमृतवाहिनी इंटरनॅशनल स्कूलच्या कु. सई मेहेत्रे, कु. आरोही लंके, कु. पूर्वी पल्लोड, कु. वेदिका सातपुते, कु. जान्हवी ठाकरे, कु. आर्या क्षीरसागर, कु. अश्विनी वर्पे, कु. सृष्टी सातपुते, कु. तन्वी सरोदे, कु. जिया शेख आणि कु. अनन्या मोरे यांनी आपल्या अप्रतिम सांघिक सादरीकरणातून प्रथम पारितोषिक पटकावले. तर ज्युनिअर गटातील वैयक्तिक गायन स्पर्धेत कु. सई मेहेत्रे हिने द्वितीय पारितोषिक मिळवले तसेच सीनियर गटातील वैयक्तिक गायन स्पर्धेतही आरोही लंके - प्रथम पारितोषिक, जिया शेख - द्वितीय पारितोषिक, तन्वी सरोदे - तृतीय पारितोषिक अशी दैदिप्यमान कामगिरी करत विद्यार्थिनींनी यश मिळवले.

तसेच नांदेड येथे आयोजित डान्स ग्रुप प्रकारात साची डंग, अनुमा साबळे, सानवी चांगले, सेजल सोनवणे, आद्या साबळे, आदिश्री मंडलिक, वेदिका सातपुते, पूर्वी पल्लोड, जान्हवी ठाकरे, आर्या क्षीरसागर, अश्विनी वर्पे आणि सृष्टी सातपुते यांनी आपल्या तालबद्ध, आकर्षक आणि दमदार सादरीकरणातून प्रथम पारितोषिक पटकावले. आणि सब-ज्युनिअर गटातील वैयक्तिक नृत्य प्रकारात कु. त्रिशा कदम हिने तृतीय पारितोषिक मिळवले. ज्युनिअर गटातील वैयक्तिक नृत्य प्रकारात आदिश्री मंडलिक आणिअनन्या मोरे यांनी तृतीय पारितोषिक, तर श्राव्या पांडे हिने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवत आपल्या कलागुणांना राष्ट्रीय स्तरावर सिद्ध केले. ड्युएट डान्स प्रकारात कु. राजवी मुरादे आणि कु. स्वरा पवार यांनी अप्रतिम नृत्याविष्कार सादर करत तृतीय पारितोषिक पटकावले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी शिक्षण व महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ.सुधीर तांबे, संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त सौ.शरयूताई देशमुख, डॉ.जयश्रीताई थोरात, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे व्यवस्थापक प्रा. व्ही. बी. धुमाळ, प्राचार्य सौ. जे. बी. शेठी यांच्यासह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

Daily Yuvavarta

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

# अंधश्रद्धा निर्मूलन आणि अवयवदान काळाची गरज : अ‍ॅड. रंजना गवांदे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : जगात चमत्कार अस्तित्वात नाही. हात चला की किंवा विज्ञानाच्या आधारे तो घडवला जातो. मात्र चमत्काराला बळी पडतो अशावेळी त्याची अंधश्रद्धेपासून मुक्तता होणे गरजेचे आहे तसेच आजच्या गतिमान युगात मानवाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते अपघात आणि विविध आजारांमुळे निकामी होणाऱ्या अवयवांमुळे मृत्यूच्या दारात असलेल्या रुग्णांना अवयव दानातून जीवनदान मिळते म्हणून अवयव दानासाठी समाजाने पुढाकार घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्यसचिव अ‍ॅड. रंजना गवांदे यांनी केले.

डॉ. आर. एस. गुंजाळ वेलफेअर फाउंडेशन संचलित वृंदावन होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज येथे डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृती दिनानिमित्त वैज्ञानिक जाणीवा आणि मरणोत्तर देहदान व अवयव दान संकल्प शिबिरात ड रंजना गवांदे बोलत होत्या. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या अभिवादन गीताने शिबिराला सुरुवात झाली. यावेळी प्राचार्या डॉ पूनम ढगे, अंनिसचे जिल्हा प्रधान सचिव प्राचार्य अशोक गवांदे, अंनिस संगमनेर शाखेचे कार्याध्यक्ष काशिनाथ गुंजाळ, खजिनदार अरविंद गाडेकर, प्रशांत पानसरे, सुधीर नेहे, डॉ. संगीता अनवट, डॉ. सुपेरा खान, डॉ. सुरेश बालोडे, प्राचार्य दिलावर फारुख उपस्थित होते.

अ‍ॅड. रंजना गवांदे म्हणाल्या, अंधश्रद्धेच्या गर्तेत अडकलेल्या समाजाला त्यातून बाहेर काढण्यासाठी डॉ. नरेंद्र दाभोळकरांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना केली. अंधश्रद्धांना विरोध, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार, प्रसार करणे, धर्माची विधायक चिकित्सा आणि मानवी मूल्यांचा पुरस्कार या चतुसूत्रीच्या माध्यमातून त्यांनी समाजात विवेकाचा जागर केला. अनेक भोंदू बुवा बाबा दैवी शक्ती प्राप्त असल्याचा बहाणा करून समाजाची फसवणूक करतात. यासाठी प्रत्येकाने वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अंगीकार करणे आवश्यक आहे. काशीनाथ गुंजाळ देहदान आणि अवयवदानाबद्दल बोलताना म्हणाले, अवयव दानाच्या रूपाने मृत्यूनंतरही जिवंत राहण्याची संधी प्राप्त होते आज समाजात अपघात अथवा आजारपणामुळे अवयव निकामी होऊन मृत्यू होणाऱ्यांची संख्या वाढत आहे अशावेळी गरजू रुग्णांना उपलब्ध झाले तर त्यांना जीवनदान मिळू शकते. एका व्यक्तीच्या अवयवांपासून किमान आठ जणांना अवयव दानाचा लाभ मिळतो. रक्तदानाप्रमाणेच नेत्रदान आणि अवयवदानाबाबत समाजात जागरूकता निर्माण करावी असे आवाहनही काशिनाथ गुंजाळ यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. संगीता अनवट यांनी केले तर आभार डॉ. सुपेरा खान यांनी मानले.


**पाहिजेत**

जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी

सेल्स एक्झीक्युटिव्ह -४

मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४

हेल्पर - २

मेन रोड, संगमनेर

7588249849


महाराष्ट्र शासन
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग
उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर
यांचे कार्यालय, यशवंतराव चव्हाण प्रशासकीय भवन, तिसरा मजला, नवीन नगर रोड, संगमनेर, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर
Email - dr_sangmner@rediffmail.com

जा.क्र वि-१/बु नवले पत/जाहिर समन्स/कलम १०१/सन २०२६ — दिनांक २१/०८/२०२६

**-: जाहीर समन्स नोटीस :-**

ज्याअर्थी वादी बुवासाहेब नवले ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या अकोल शाखा संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर यांनी प्रतीवादी यांचे विरुध्द या कार्यालयात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये प्रमाणपत्र मिळणे कामी दावा दाखल केला आहे व वसुली प्रमाणपत्राची मागणी केली आहे.

त्याअर्थी खाली नमुद प्रतिवादी यांना नैसर्गिक न्यायतत्वाच्या दृष्टीने नोटीस देण्यात येते की, आपण वार मंगळवार दिनांक १/९/२०२६ रोजी सकाळी. ११.०० वाजता उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर, यशवंतराव चव्हाण प्रशाकिय भवन, तिसरा मजला, नविन नगर रोड, संगमनेर या कार्यालयात सदर दाव्यामध्ये लेखी तोंडी म्हणणे देणे कामी हजर राहावे. सदर दिवसी व वेळेत आपण हजर न राहील्यास अथवा लेखी म्हणणे आपण सादर न केल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

| अ. क्र. | दावा क्रमांक | प्रतीवादी (कर्जदार व जामिनदार) | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| 0१ | १३४/२०२६ | १. कर्जदारः श्री. सतिष शांताराम कडलग<br>रा. जवळे कडलग ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>२. सहकर्जदारः श्री. शांताराम यशवंत कडलग<br>रा. जवळे कडलग ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>३. जामिनदार : श्री. संजय विजय कडलग<br>रा. जवळे कडलग ता. संगमनेर जि. अहिल्यानगर<br>३. जामिनदारः शंकर यादव भिंगारे<br>रा. इंदिरा नगर गल्ली नं. १, संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर | २३,७०,२४८/- |

ही नोटीस आज दिनांक २१/८/२०२६ रोजी माझे सही व कार्यालयाच्या मुद्रेसह दिली आहे.

(संतोष कोरे)
उपनिबंधक,
सहकारी संस्था, संगमनेर


**पाहिजेत**

**डी. एम. मुळे चष्मावाला**

त्वरीत माणसे भरणे आहे

पुरूष - ४ जागा

आकर्षक पगार

प्रत्यक्षात येऊन भेटावे

पत्ता- पडताणी कॉम्पलेक्स, संगमनेर



**पाहिजेत**

स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस

सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५

पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड

संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर

7709828846


तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर,
यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com — दूरध्वनी (०२४२५) २२५३५३

क्र. कावी/ जन्म नोंद/६२६/२०२६ — दिनांक - २१/०८/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. जयश्री सदाशिव नवसे, रा. नारायणगाव ता. सिन्नर, जि. नाशिक** यांनी दिनांक १७/०७/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा.नारायणगाव, ता. सिन्नर, जि. नाशिक** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची स्वत: नामे **जयश्री सदाशवि नवसे** यांचा **जन्म मौजे साकुर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक १९/०४/१९७४** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **जन्म** नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी साकुर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी साकुर यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुट्टीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर,
यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com — दूरध्वनी (०२४२५) २२५३५३

क्र. कावी/ जन्म नोंद/६२२/२०२६ — दिनांक - २०/०८/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. अशोक सखाराम बनसोडे, रा. दाढ बु., ता. ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक ३०/०६/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. दाढ बु., ता. ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची स्वत: नामे **अशोक सखाराम बनसोडे** यांचा **जन्म मौजे साकुर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक ०२/०६/१९५६** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **जन्म** नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी साकुर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी साकुर यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुट्टीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


**पाहिजेत**

सुंदरम गोल्ड आणि प्लास्टिक, संगमनेर

ऑफसेट मशिन ऑपरेटर १ जागा

स्क्रिन प्रिटींग – २ जागा

टेलीकॉलर – २ (महिला)

– संपर्क –

९८२२४५३०३६



SR THORAT — JOB — GAGANGIRI PACKAGED PURITY

| Sr. No. | Post | QTY | Qualification and Experience |
|---|---|---|---|
| 1 | Security Guard | 5 | Experience Minimum 5 Year (Ex-Servicemen preferred) |
| 2 | Fitter/Welder/ Mechanical/ Electrical/ Refrigeration | 5 | ITI,DME or any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 3 | Data Operator/ Supervisor | 5 | Any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 4 | Chemist | 5 | B.Sc. Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |

Office Address-S.R.Thorat Milk Products Pvt.Ltd, Rajapur Road,Sangamner, Dist- Ahilyanagar

Mobile Number – 9860100936/937

Sent the CV Following E-Mail Id:

admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com






**पाहिजेत**

श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स्
श्री गणेश टायर्स
श्री गणेश ऑइल सेंटर
या फर्मसाठी

अकाऊंटंट - 2 जागा

पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक

कामाचा अनुभव आवश्यक

८९९९८६२७५९



नेवासकर ऑटोमोबाईल्स

**पाहिजेत**

सर्व्हीस सुपरव्हायझर २ जागा

संगमनेर

8793223344
8446300400



**पाहिजेत**

डाटा एन्ट्री ऑपरेटर - २
शिक्षण - ग्रॅज्युवेट/१२ वी –

डायलिसिस टेक्निशियन -२

कॅथलॅब टेक्निशियन - १

नर्सिंग सुपरवाईझर -१

कुटे हॉस्पिटल

ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,

8888882225
9766855593



**फ्लॅट विकणे आहे**

2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह

ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर

– संपर्क –

8788945208
8208223721

# छात्रों की गुंज'साठी डॉ. जयश्री थोरात यांच्या नेतृत्वात २ हजार विद्यार्थी पुण्यात



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर - काँग्रेस पक्षाचे नेते खासदार राहुल गांधी हे पुणे येथे राज्यातील विद्यार्थ्यांशी संवाद साधणार असून छात्रों की गुंज या कार्यक्रमासाठी काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य मा.प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली व संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ.जयश्रीताई थोरात यांच्या नेतृत्वात २००० विद्यार्थी या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

## विद्यार्थ्यांचे प्रश्न आहे का ? समजून घ्या, आवाज दडपवू नका - डॉ. जयश्रीताई थोरात

**शिष्यवृत्ती चा प्रश्न मांडणाऱ्या पुणे येथील विद्यार्थ्यांवर पोलिसांनी लाठी हल्ला केला असून हा अत्यंत दुर्दैवी आहे. विद्यार्थ्यांचे प्रश्न आहे का ? समजून घ्या. त्यांचा आवाज दडपऊ नका. ही झेन झी आहे त्यांना समजावून घ्यावा लागेल. खासदार राहुल गांधी यांच्या छात्रो की गुंज कार्यक्रमाला देशभरातून मोठा प्रतिसाद मिळत असून त्यामुळे विरोधक या कार्यक्रमाबाबत संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. विद्यार्थ्यांमधील उत्साह आणि आत्मविश्वास यामुळे पुणे येथील हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी होईल असा विश्वास व्यक्त करताना सरकारने विद्यार्थ्यांचे प्रश्न समजून घ्या असे आवाहन युवक काँग्रेसच्या नेत्या डॉ.जयश्रीताई थोरात यांनी केले आहे.**

यशोधन जनसंपर्क कार्यालय येथून या सर्व विद्यार्थिनी पुणे कडे रवाना झाले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय,विद्यार्थी एकतेचा विजय असो, वंदे मातरम, भारत माता की जय, छात्रों की गुंज सरकार को सुननी पडेगी, जय हिंद जय महाराष्ट्र या घोषणांनी परिसर दुमदुमला.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी हे देशभरातील युवकांशी छात्रों की गुज या कार्यक्रमाच्या माध्यमातून संवाद साधत आहे. विद्यार्थ्यांचे विविध प्रश्न त्यांच्या अडचणी समजून घेत केंद्र सरकार आणि राज्य सरकार पुढे मांडत आहे. या कार्यक्रमाची सत्ताधाऱ्यांनी मोठी धास्ती घेतली आहे.

यामुळे पुण्यामध्ये काल या कार्यक्रमासाठी सहभागी होणाऱ्या विद्यार्थिनींवर लाठी चार्ज करण्यात आला. या घटनेचा संपूर्ण महाराष्ट्रातून निषेध झाला. काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी या घटनेचा तीव्र निषेध केला तर या विद्यार्थ्यांचा काय दोष म्हणून सरकारला सवाल विचारला याचबरोबर ससून हॉस्पिटलमध्ये जाऊन जखमी विद्यार्थ्यांची भेट घेतली. यावेळी समवेत माजी मंत्री विजय वडेट्टीवार, माजी मंत्री सतेज पाटील, माजी आमदार मोहन जोशी यांसह विविध काँग्रेस पक्षाचे नेते उपस्थित होते.

या विद्यार्थ्यांवरील झालेल्या लाठी हल्ल्याचा युवक काँग्रेस नेत्या डॉ.जयश्रीताई थोरात यांनीही तीव्र शब्दात निषेध केला. विद्यार्थ्यांचा आवाज सरकार दाबू शकत नाही. विद्यार्थ्यांचा आवाज सरकारला ऐकावा लागेल.जखमी विद्यार्थ्याला धीर देत त्याला ससून हॉस्पिटलमध्ये ऍडमिट केले. राज्यभरातून पुणे येथील ए आय एस एस एम एस शैक्षणिक संस्थेच्या मैदानावर सायं पाच वाजता हा कार्यक्रम होणार असून संगमनेर मधून शहर व तालुक्यातील २००० विद्यार्थीनी या कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत थेट राहुल गांधींशी संवाद साधण्याची संधी या विद्यार्थिनींना डॉ जयश्रीताई थोरात यांच्या माध्यमातून मिळणार आहे. विद्यार्थिनींचा उत्साह घोषणाबाजी यामुळे संगमनेर चा आवाज पुणे येथील कार्यक्रमात घुमणार आहे.

# पानोडीत भरदिवसा महिलेच्या गळ्यातून मंगळसूत्र ओरबाडले



युवावार्ता (प्रतिनिधी)- संगमनेर - संगमनेर तालुक्यातील पानोडी येथील जाधव वस्ती परिसरात शुक्रवारी (दि. २१) दुपारी भरदिवसा एका किराणा दुकानात पाणी मागण्याच्या बहाण्याने आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील दोन तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र ओरबाडून नेले. या धाडसी चोरीमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. विशेष म्हणजे या घटनेची तक्रार देण्यासाठी गेलेल्या पीडित कुटुंबाला आश्वी पोलिसांनी उद्या या असे सांगून परत पाठवल्याने पोलिसांच्या कारभारावर नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, पानोडी येथील जाधव वस्तीवर रंगनाथ काशिनाथ मुंढे यांच्या मालकीचे किराणा दुकान आहे. शुक्रवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास दुकानाचे व्यवहार सुरू असताना मोटारसायकलवरून काळे कपडे परिधान केलेले दोन अज्ञात तरुण दुकानासमोर आले. यावेळी दुकानात रंगनाथ मुंढे यांची सून अनिता सचिन मुंढे या एकट्याच उपस्थित होत्या. चोरट्यांनी सुरुवातीला पिण्याच्या पाण्याची बाटली मागितली. त्यानंतर त्यांनी

५०० रुपयांची नोट काढून सुट्टे पैसे देण्याची विनंती केली. अनिता मुंढे यांनी सुट्टे पैसे नसल्याचे सांगताच, एका चोरट्याने १० रुपयांचे नाणे त्यांच्या हातात दिले. यावेळी अनिता यांचे लक्ष विचलित झाल्याची संधी साधत, चोरट्याने त्यांच्या गळ्यातील दोन तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र जोरात ओढले. त्यानंतर अनिता मुंढे यांनी आरडाओरडा केला. रंगनाथ मुंढे यांनी तत्काळ दुचाकीवरून चोरट्यांचा पाठलाग सुरू केला आणि गावातील तरुणांना फोनवरून माहिती दिली. तरुणांनी प्रसंगावधान राखून गावाकडे जाणारा रस्ता बंद केला. मात्र, रस्ता बंद झाल्याची चाहूल लागताच सराईत चोरट्यांनी आपली दुचाकी वळवून पिंपरी लौकीच्या दिशेने वेगाने पलायन केले.

या गंभीर घटनेनंतर मुंढे कुटुंब तक्रार देण्यासाठी आश्वी पोलीस ठाण्यात गेले होते. मात्र, कर्तव्यावर असलेल्या पोलिसांनी तक्रार देण्यासाठी उद्या या असे सांगून त्यांना परत पाठवले. .

# अक्षय जगताप यांचे नेदरलँडमध्ये निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर येथील जगताप मळा येथील रहिवासी व मर्चंट नेव्हीमध्ये कार्यरत असलेले अक्षय जगताप यांचे नेदरलँड येथे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या आकस्मिक निधनाने जगताप व जोंधळे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

अक्षय जगताप हे मर्चंट नेव्हीमध्ये कार्यरत होते. कामानिमित्त ते नेदरलँड येथे असताना त्यांची प्रकृती बिघडली. अक्षय जगताप हे प्रखर हिंदुत्ववादी विचारांचे समर्थक होते. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे ते निस्सीम चाहते होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांबद्दल त्यांना विशेष आस्था होती. त्यांच्या मनमिळावू स्वभावामुळे आणि आपुलकीच्या वागणुकीमुळे त्यांनी मित्रपरिवार व परिचितांच्या मनात आपले वेगळे स्थान निर्माण केले होते. त्यांच्या पश्चात पत्नी पल्लवी अक्षय जगताप, मुलगी हिंदवी अक्षय जगताप, भाऊ मंदार दीपक जगताप, आई ग. भा. मीना दीपक जगताप, आजी ग. भा. चंद्रभागा रघुनाथ जगताप, बहीण माधुरी सचिन गुंजाळ तसेच मोठा नातेवाईक परिवार असा परिवार आहे. अक्षय जगताप यांच्यावर शनिवार दिनांक २२ ऑगस्ट रोजी येथील अमरधाममध्ये शोकाकुल वातावरणात अंत्यविधी करण्यात आला. दशक्रिया विधी रविवार, दि. २३ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्या वतीने कै. अक्षय जगताप यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# आधी अत्याचाराची तक्रार नंतर तक्रारदार महिलेची भूमिका बदलली

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - विवाहित महिलेवर अत्याचार केल्याच्या आरोपावरून माकंप नेते तथा सह्याद्री आदिवासी संघटनेचे तालुकाध्यक्ष तुळशीराम मंगा कातोरे (वय ४०, रा. देवठाण) यांच्याविरुद्ध अकोले पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याने तालुक्यातील राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, गुन्हा दाखल झाल्यानंतर संबंधित महिलेने आपणासोबत असा कोणताही प्रकार घडला नसल्याच्या आशयाचे लेखी निवेदन दिल्याची माहिती समोर आल्याने या प्रकरणाला नाट्यमय वळण मिळाले आहे.

फिर्यादी महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, २३ जुलै २०२६ रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास अकोले शहरातील एका लॉजवर अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच हा प्रकार कोणाला सांगितल्यास पती आणि मुलांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या तक्रारीच्या आधारे अकोले पोलिसांनी कातोरे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक समाधान पडोळ या प्रकरणाचा तपास करीत आहेत. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून न्यायालयाने त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावल्याची माहिती आहे.

दरम्यान, गुन्हा दाखल झाल्यानंतर तक्रारदार महिलेने आपली भूमिका बदलल्याचे समोर आल्याने तपास यंत्रणेसमोरही अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. महिलेने भूमिका दबावामुळे बदलली आहे का, की सुरुवातीची तक्रारच अन्य कारणातून करण्यात आली होती, याचा तपास आता पोलिसांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

आरोपांची सत्यता तपासण्यासाठी पोलिसांकडून कायदेशीर प्रक्रियेनुसार आरोपीची वैद्यकीय तपासणी तसेच अन्य आवश्यक तपासणी केली जात असताना, संबंधित महिलेने मात्र वैद्यकीय तपासणीस नकार दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे तक्रार, त्यानंतरचे लेखी निवेदन, वैद्यकीय तपासणीस नकार आणि आरोपीविरुद्ध करण्यात आलेले आरोप या सर्व बाबींची पोलिसांकडून स्वतंत्रपणे पडताळणी केली जाणार का, याकडे आता तालुक्याचे लक्ष लागले आहे.

या प्रकरणातील नेमके सत्य तपासाअंतीच स्पष्ट होणार असून, पोलिस तपासात कोणते पुरावे समोर येतात आणि तक्रारदार महिलेच्या बदललेल्या भूमिकेमागील कारण काय आहे, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

## दिनविशेष

२०१२: — राजस्थानात अतिवृष्टीमुळे ३० जण ठार.

२०११: — लिबियाचा हुकूमशहा मुअम्मर गडाफीची सत्ता संपुष्टात.

२००५: — कविवर्य विंदा करंदीकर यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान.

१९९७: — हळदीच्या पेटंटबाबतचा अमेरिकेशी चालू असलेला कायदेशीर लढा भारताने जिंकला. एखाद्या विकसनशील देशाने अमेरिकन पेटंटला आव्हान देऊन तो जिंकण्याची ही पहिलीच घटना आहे.

१९९१: — वर्ल्ड वाईड वेब सार्वजनिक उपयोगासाठी सुरु झाले.

१९९०: — आर्मेनिया सोव्हिएत युनियनपासून स्वतंत्र झाला.

१९६६: — लुनार ऑर्बिटर-१ या मानवरहित अंतराळयानाने चंद्रावरून पहिल्यांदाच पृथ्वीची छायाचित्रे काढली.

## जन्म

१९७४: कॉन्स्टँटिन नोव्होसेलोव्ह — रशियन-इंग्रजी भौतिकशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक — नोबेल पुरस्कार

१९७३: मलायका अरोरा खान — भारतीय अभिनेत्री, नृत्यांगना, मॉडेल आणि दूरचित्रवाणी व्यक्तिमत्त्व — विविध मनोरंजन आणि नृत्य पुरस्कार

१९६८: कृष्णकुमार कुन्नाथ (केके) — सुप्रसिद्ध भारतीय गायक (निधन: ३१ मे २०२२ )

१९६४: काँग ही — सिटी हार्वेस्ट चर्चचे संस्थापक आणि माजी वरिष्ठ पास्टर

१९५१: नूर — जॉर्डनची राणी

१९५१: अखमद कादिरोव — चेचन प्रजासत्ताक देशाचे १ले अध्यक्ष, चेचन धर्मगुरू आणि राजकारणी (निधन: ९ मे २००४ )

१९५१: राणी नूर — जॉर्ड देशाची राणी

१९४४: सायरा बानू — भारतीय अभिनेत्री आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री — विविध जीवनगौरव सन्मान

१९३३: रॉबर्ट कर्ल — अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ — नोबेल पुरस्कार (निधन: ३ जुलै २०२२

१९३१: हॅमिल्टन ओ. स्मिथ — अमेरिकन सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक — नोबेल

## मृत्यू

६३४: अबू बक्र — रशीदुन खलीफाचे पहिले खलिफा (जन्म: २७ ऑक्टोबर ५७३ )

४०६: रडगाईसुस — गॉथिक राजा

२०२२: एस. व्ही. वेणुगोपन नायर — भारतीय लेखक (जन्म: १८ एप्रिल १९४५ )

२०१६: रेनहार्ड सेल्टन — जर्मन अर्थशास्त्रज्ञ आणि गणितज्ञ — नोबेल पुरस्कार (जन्म: ५ ऑक्टोबर १९३० )

२०१३: रिचर्ड जे. कॉर्मन — अमेरिकन उद्योगपती, आर.जे. कॉर्मन रेलरोड ग्रुपचे संस्थापक (जन्म: २२ जुलै १९५५ )

२००३: मायकेल किजाना वामलवा — केनिया देशाचे ८वे उपाध्यक्ष, वकील आणि राजकारणी (जन्म: २५ नोव्हेंबर १९४४ )

१९९७: एरिक गेयरी — ग्रेनेडा देशाचे १ले पंतप्रधान, ग्रेनेडियन शिक्षक आणि राजकारणी (जन्म: १८ फेब्रुवारी १९२२ )

१९९७: जॉन केंद्रू — इंग्रजी बायोकेमिस्ट आणि क्रिस्टलोग्राफर — नोबेल पुरस्कार (जन्म: २४ मार्च १९१७ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.


**२३ ऑगस्ट**

# २०१२ : मुसळधार पावसाने राजस्थान हादरले, ३० जणांचा मृत्यू

२०१२ मध्ये राजस्थानात झालेल्या अतिवृष्टीने अनेक भागांत जनजीवन विस्कळीत झाले होते. नेहमीच कमी पावसासाठी ओळखल्या जाणाऱ्या राजस्थानात मुसळधार पावसाने अचानक थैमान घातल्याने अनेक जिल्ह्यांना पुराचा फटका बसला. या नैसर्गिक आपत्तीत सुमारे ३० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली होती. मोठ्या प्रमाणावर घरे, रस्ते आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले, तर अनेक कुटुंबांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे लागले.राजस्थानच्या अनेक भागांत काही दिवसांतच मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने नद्या, नाले आणि जलाशयांच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ झाली. सखल भागांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली. अनेक गावांचा आणि शहरांचा संपर्क तुटला. काही ठिकाणी रस्ते पाण्याखाली गेल्याने वाहतूक व्यवस्था ठप्प झाली, तर रेल्वे सेवेलाही काही भागांत पावसाचा फटका बसला.या अतिवृष्टीचा सर्वाधिक परिणाम ग्रामीण भागातील नागरिकांवर झाला. कच्ची घरे, झोपड्या आणि जुन्या बांधकामांना पावसामुळे धोका निर्माण झाला. काही ठिकाणी घरांच्या भिंती किंवा छत कोसळल्याने जीवितहानी झाली. पाण्याच्या जोरदार प्रवाहात वाहून जाणे, घरांच्या दुर्घटना आणि इतर अपघातांमुळे मृत्यू झाल्याचे वृत्त होते.शेती क्षेत्रालाही या अतिवृष्टीचा मोठा फटका बसला. पिके पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. अनेक ठिकाणी शेतांमध्ये पाणी साचल्याने उभ्या पिकांचे नुकसान झाले. पशुधनही संकटात सापडले. ग्रामीण अर्थव्यवस्थेवर या आपत्तीचा परिणाम जाणवला.आपत्तीची तीव्रता लक्षात घेऊन प्रशासन आणि बचाव पथकांनी मदतकार्य सुरू केले. पूरग्रस्त भागातील नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले. अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यासाठी बचावकार्य राबवण्यात आले. प्रशासनाकडून अन्न, पिण्याचे पाणी आणि आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न करण्यात आले.राजस्थानातील या घटनेने नैसर्गिक आपत्तीसमोर आधुनिक यंत्रणांनाही किती मोठे आव्हान निर्माण होऊ शकते, हे स्पष्ट केले. विशेषतः हवामानातील बदलत्या स्वरूपामुळे पारंपरिक पर्जन्यमानाच्या पद्धतींमध्ये बदल होत असल्याचे अशा घटनांमधून दिसून येते. कमी पावसाचा प्रदेश म्हणून ओळख असलेल्या राज्यात अल्प कालावधीत अतिवृष्टी झाल्यास त्याचे परिणाम अधिक गंभीर ठरू शकतात.२०१२ मधील राजस्थानातील अतिवृष्टी ही केवळ एक नैसर्गिक आपत्ती नव्हती, तर आपत्ती व्यवस्थापन, जलनियोजन आणि हवामानातील बदलत्या परिस्थितीबाबत अधिक सज्ज राहण्याचा इशारा होता. जीवितहानी टाळण्यासाठी वेळेवर हवामानाचा अंदाज, प्रभावी पूर्वसूचना व्यवस्था, सुरक्षित स्थलांतर आणि स्थानिक पातळीवरील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सक्षम असणे किती आवश्यक आहे,

# एस. व्ही. वेणुगोपन नायर : वास्तववादी लेखणीचा प्रवास

**पुण्यतिथी विशेष**



एस. व्ही. वेणुगोपन नायर हे मल्याळम भाषेतील प्रसिद्ध कथाकार, लेखक, अनुवादक आणि शिक्षक होते. आपल्या साहित्यकृतींमधून त्यांनी सामान्य माणसांचे जीवन, त्यांच्या भावना, सामाजिक वास्तव आणि दैनंदिन संघर्ष यांचे प्रभावी चित्रण केले. २३ ऑगस्ट २०२२ रोजी वयाच्या ७७व्या वर्षी तिरुवनंतपुरम येथे त्यांचे निधन झाले.वेणुगोपन नायर यांचा जन्म १८ एप्रिल १९४५ रोजी केरळमधील नेय्याट्टिंकरा येथे झाला. त्यांनी कुलतूर हायस्कूल आणि तिरुवनंतपुरम येथील युनिव्हर्सिटी कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. पुढे त्यांनी मल्याळम साहित्य विषयात एम.ए., एम.फिल. आणि पीएच.डी. या उच्च पदव्या मिळवल्या. १९६५ मध्ये त्यांनी महाविद्यालयीन अध्यापनाला सुरुवात केली. स्कॉट ख्रिश्चन कॉलेज, नॅयर सर्व्हिस सोसायटीच्या विविध महाविद्यालयांमध्ये त्यांनी मल्याळमचे प्राध्यापक म्हणून काम केले आणि अखेरीस ओट्टापालम येथील एनएसएस कॉलेजचे प्राचार्य म्हणून निवृत्त झाले.कथालेखन हे त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीचे प्रमुख वैशिष्ट्य होते. 'आदिशेषन', 'गर्भश्रीमन्', 'मृतितालम्', 'रेखयिल्लाथा ओराळ', 'भूमिपुत्रन्टे वझी', 'ओट्टापालम', 'एंटे परदैवंगल', 'कथकलतिसादरम्' यांसारखे त्यांचे कथासंग्रह विशेष गाजले. त्यांच्या कथांमध्ये सामान्य माणसांच्या आयुष्यातील छोट्या-छोट्या प्रसंगांना सामाजिक आणि मानवी संदर्भ मिळतो. त्यांच्या लेखनातील साधी भाषा, स्थानिक बोलीचा वापर आणि वास्तववादी व्यक्तिरेखा हे विशेष उल्लेखनीय मानले जातात.साहित्याबरोबरच त्यांनी अनुवाद आणि साहित्य संशोधनाच्या क्षेत्रातही योगदान दिले. जोसेफ कॉनरॅड यांच्या 'Lord Jim' या कादंबरीचा त्यांनी मल्याळममध्ये अनुवाद केला. तसेच काओ शुएछिन यांच्या प्रसिद्ध चिनी कादंबरीचे 'चुवन्ना अकथलथिंटे किनावु' या नावाने मल्याळम भाषांतर केले. मल्याळम भाषा आणि साहित्यावरील संशोधनपर लेखनही त्यांनी केले.त्यांच्या साहित्यिक योगदानाची अनेक पुरस्कारांनी दखल घेतली. 'भूमिपुत्रन्टे वझी' या कथासंग्रहासाठी त्यांना १९९० मध्ये केरळ साहित्य अकादमीचा कथा पुरस्कार मिळाला. 'रेखयिल्लाथा ओराळ'साठी एडस्सेरी पुरस्कार, 'बंधनस्थनाया अनिरुद्धन'साठी पद्मराजन पुरस्कार आणि 'वेडिन्टे नानार्थम्'साठी अबुधाबी शक्ती पुरस्कार मिळाला. 'स्वदेशाभिमानी' या नाटकासाठी २०१७ मध्ये केरळ साहित्य अकादमीचा नाट्य पुरस्कारही त्यांना मिळाला.लेखक म्हणूनच नव्हे, तर उत्तम शिक्षक आणि वक्ते म्हणूनही वेणुगोपन नायर यांची ओळख होती. त्यांच्या लेखनात स्थानिक जीवनाचा गंध आणि सामान्य माणसांविषयीची आस्था जाणवते. त्यामुळे त्यांच्या कथा केरळमधील अनेक पिढ्यांच्या वाचकांच्या मनात स्थान निर्माण करू शकल्या.२३ ऑगस्ट २०२२ रोजी त्यांच्या निधनाने मल्याळम साहित्यविश्वाने एक संवेदनशील कथाकार आणि अनुभवी शिक्षक गमावला. त्यांच्या कथा, अनुवाद आणि साहित्यिक विचारांमधून त्यांनी मल्याळम साहित्याला दिलेले योगदान दीर्घकाळ स्मरणात राहील.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक **युवावार्ता**
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



श्री महाकालेश्वराचे अलौकिक दर्शन!
श्रावण मासानिमित्त भक्ती शक्ती मंदिरात, उज्जैनच्या
श्री महाकालेश्वराचा प्रतिरूपाचे दर्शनाचा लाभ घ्यावा.
श्रावण मासारंभ निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
भक्ती शक्ती मंदिर
डेरे फाउंडेशन कॅम्पस, कऱ्हे फाटा, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर
॥ ॐ नमः शिवाय ॥ ॥ श्री दत्तात्रेय नमः ॥ ॥ श्री विठ्ठल रुक्मिणी ॥

# कुंभेफळ येथे बिबट्याचा चिमुकल्यावर हल्ला, ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - तालुक्यातील कुंभेफळ येथे घरासमोरील अंगणात खेळत असलेल्या अवघ्या तीन वर्षीय चिमुकल्यावर बिबट्याने अचानक हल्ला केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (दि. २१) दुपारी तीनच्या सुमारास घडली. अंकुर प्रशांत कोटकर असे बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या बालकाचे नाव आहे. आई, आजी, आजोबा तसेच शेतातील कामगारांनी प्रसंगावधान राखत आरडाओरड केल्याने बिबट्याच्या तावडीतून अंकुरची सुटका झाली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या अंकुरला तातडीने सुगाव येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारांसाठी त्याला संगमनेर येथील खासगी रुग्णालयात हलविण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच वनरक्षक पोपट कोटकर व बबन झोळेकर यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. वनपरिक्षेत्र अधिकारी आनंदा पाटील यांनीही रुग्णालयात जाऊन जखमी अंकुरची विचारपूस केली. वन विभागाच्या पथकाने परिसराची पाहणी करून नागरिकांना विशेषतः लहान मुलांना एकटे बाहेर न सोडण्याचे तसेच रात्रीच्या वेळी अधिक सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

कुंभेफळ परिसरात बिबट्याचा वाढता वावर ग्रामस्थांसाठी चिंतेचा विषय बनला आहे. विशेष म्हणजे याच परिसरात मे महिन्यात तीन वर्षीय श्रीशा वैभव शिंदे या बालिकेवरही बिबट्याने हल्ला केला होता. त्यावेळी ग्रामस्थांनी आरडाओरड केल्याने बिबट्याने तेथून पळ काढला आणि मोठा अनर्थ टळला होता. अवघ्या काही महिन्यांच्या अंतराने पुन्हा एकदा चिमुकल्यावर हल्ला झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याचा तातडीने बंदोबस्त करून नागरिकांना सुरक्षितता मिळवून द्यावी, अशी मागणी दिलीप कोटकर, सुनील कोटकर, संजय कोटकर, नामदेव कोटकर, यशवंत पांडे, शंकर पांडे, संपत कोटकर यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे.

दरम्यान, बिबट्याला जेरबंद करण्यासाठी शनिवारी घटनास्थळी पिंजरा लावण्यात येणार असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी आनंदा पाटील यांनी दिली.

# सारोळे पठार येथे जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

## पाच जण रंगेहात ताब्यात; २ लाख ५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सारोळे पठार शिवारातील शेतातील पत्र्याच्या शेडच्या आडोशाला सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर घारगाव पोलिसांनी धडक कारवाई करत पाच जणांना रंगेहात पकडले. या कारवाईत रोख रक्कम, तीन मोटारसायकली व पाच मोबाईल असा तब्बल २ लाख ५ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे.

दि. २१ ऑगस्ट २०२६ रोजी घारगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांना सारोळे पठार गावाच्या शिवारात बबन मुरलीधर फटांगरे यांच्या शेतातील पत्र्याच्या शेडच्या आडोशाला काही इसम 'तिरट' नावाचा हार-जीतीचा जुगार पैशांची पैज लावून खेळत असल्याची गुप्त माहिती मिळाली. माहितीची खातरजमा करून पोलिसांच्या पथकाने पंचांसह संबंधित ठिकाणी अचानक छापा टाकला.

यावेळी जुगार खेळताना गणेश बाळासाहेब घुले (३१), रमेश हरिभाऊ मोहिते (३८), संतोष रामकृष्ण यशवंत (४७), किरण लक्ष्मण मोहिते (३७), सर्व रा. सारोळे पठार, तसेच रामदास भिका घुले (५५, रा. सावरगाव घुले) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. कारवाईदरम्यान आरोपींकडून ५ हजार ८५० रुपये रोख, अंदाजे १ लाख ५० हजार रुपये किमतीच्या तीन मोटारसायकली आणि ५० हजार रुपये किमतीचे पाच मोबाईल असा एकूण २ लाख ५ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक फौजदार नारायण ढोकरे, पोलीस हवालदार बाबूराव गोडे, प्रमोद गाडेकर, सुभाष बोडखे आणि चांगदेव नेहे यांच्या पथकाने केली. जुगार अड्ड्यांवर सुरू असलेल्या अवैध कारवायांविरोधात घारगाव पोलिसांनी केलेल्या या धडक कारवाईमुळे परिसरातील अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

दरम्यान, घारगाव पोलिसांकडून परिसरातील अवैध जुगार अड्डे, मटका तसेच इतर बेकायदेशीर धंद्यांवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून, अशा कारवायांना आळा घालण्यासाठी नियमितपणे कारवाई केली जात आहे. नागरिकांनीही आपल्या परिसरात सुरू असलेल्या संशयास्पद किंवा अवैध धंद्यांची माहिती पोलिसांना द्यावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलीची सुटका

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - येथील स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत कोपरगावातून पळवून आणलेल्या एका १२ वर्षीय अल्पवयीन मुलीची दरेवाडी येथून सुखरूप सुटका केली आहे. या कारवाईदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दोन आरोपींना ताब्यात घेतले असून, त्यांना कोपरगाव शहर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. १८ ऑगस्ट २०२६ रोजी कोपरगाव येथील १२ वर्षीय अल्पवयीन मुलीला अज्ञात इसमाने पळवून नेले होते. याप्रकरणी कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेचे गांभीर्य ओळखून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी तात्काळ विशेष तपास पथक स्थापन करून आरोपी व पीडितेचा शोध सुरू केला. याप्रकरी पुढील तपास पोलीस करत आहे.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

# लाडकी बहीण योजनेचा मोठा खुलासा

मुंबई (वृत्तसंस्था)

लाडकी बहीण योजनेबाबतची अत्यंत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. आरटीआयमधूनही माहिती समोर आली आहे. जून २०२६ पर्यंत राज्यात ९२ लाख अपात्र लाभार्थींच्या खात्यात एकूण ९६०५ कोटी रुपये ट्रान्स्फर झाले आहेत. आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या महिलांना आधार मिळावा म्हणून लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली होती. त्यांना सरकारकडून दर महिन्याला १५०० रुपये आर्थिक मदत केली जाते. जून २०२४मध्ये सुरू झालेल्या या योजनेचा बोगस लाभार्थ्यांनी लाभ घेतल्यानंतर सरकारने त्याची छाननी केली असून जवळपास ९२ लाख लाभार्थ्यांना अपात्र ठरवले आहे.लाडकी बहीण योजनेबाबतची अत्यंत महत्त्वाची माहिती समोर आली आहे. आरटीआयमधूनही माहिती समोर आली आहे. जून २०२६ पर्यंत राज्यात ९२ लाख अपात्र लाभार्थींच्या खात्यात एकूण ९६०५ कोटी रुपये ट्रान्स्फर झाले आहेत. आर्थिक दृष्ट्या कमकुवत असलेल्या महिलांना आधार मिळावा म्हणून लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली होती. त्यांना सरकारकडून दर महिन्याला १५०० रुपये आर्थिक मदत केली जाते. जून २०२४मध्ये सुरू झालेल्या या योजनेचा बोगस लाभार्थ्यांनी लाभ घेतल्यानंतर सरकारने त्याची छाननी केली असून जवळपास ९२ लाख लाभार्थ्यांना अपात्र ठरवले आहे.३.६ लाख महिला आधीपासूनच संजय गांधी निराधार अनुदान योजनेचा लाभ घेत होत्या. तर, २.५ लाख प्रकरणं अशी होती की, एकाच कुटुंबातील अनेक सदस्यांनी योजनेच्या लाभासाठी नोंदणी केली होती. १.८ लाख लाभार्थींचे वय ६५ वर्षांपेक्षा अधिक होते. जिल्हास्तरीय चौकशीनंतर १.७ लाख आणि इतर लाभार्थ्यांना अपात्र घोषित करण्यात आलं आहे.

सध्या लाडकी बहीण योजनेचा लाभ १.६५ कोटी महिला घेत आहेत. नोव्हेंबर २०२५मध्ये हा आकडा २.१ कोटी होता. फेब्रुवारी ते मे २०२५ पर्यंत लाभार्थ्यांची संख्या २.४७ कोटीवर पोहोचली होती. त्यामुळे सरकारचं मासिक बजेट २४५० कोटी झाले.

दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस ब्लेज़र | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✻ कर्ज रक्कम वाढ । ✻ कर्ज व्याजदर कमी । ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

मार्स युनिव्हर्स प्रायव्हेट लिमिटेड
टूर्स, ट्रॅव्हल्स आणि कॉर्पोरेट सर्व्हिसेस
तुमचे पाऊल मंगळावर ठेवण्यासाठी मार्स युनिव्हर्स सज्ज
प्रति व्यक्ती 59,000/-* (फुकेत, बँकॉक)
प्रति व्यक्ती 79,000/-* (व्हिएतनाम, सिंगापूर, बाली)
आंतरराष्ट्रीय टूर पॅकेजेस | कॉर्पोरेट इव्हेंट मॅनेजमेंट | मिटींग्स, इन्सेंटिव्ह टूर्स | विश्वसनीय सेवा उत्तम नियोजन
1 ला ग्रुप - 26 सप्टेंबर
2 रा ग्रुप - 1 ऑक्टोबर
3 रा ग्रुप - 10 ऑक्टोबर
संपर्क - किशोर सोनवणे 9309429705

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25